# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. २९/१२/२०१८

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शनिवार दि. २९/१२/२०१७ रोजी सभा सुचना क्र. १५ दि. २४/१२/२०१८ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. व्यास रवि वासुदेव हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम | मा. सभापती |
| २. | श्री. व्यास रवि वासुदेव | सदस्य |
| ३. | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ४. | श्रीम. यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ५. | श्री. तिवारी अशोक सुर्यदेव | सदस्य |
| ६. | श्री. दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ७. | श्रीम. रावल मेघना दिपक | सदस्या |
| ८. | श्री. खंडेलवाल सुरेश जगदिश | सदस्य |
| ९. | श्री. विरानी अनिल रावजीभाई | सदस्य |
| १०. | श्रीम. दिप्ती भट्ट | सदस्या |
| ११. | श्रीम. तारा विनायक घरत | सदस्या |
| १२. | श्रीम. नुरजहा नजर हुसैन | सदस्या |
| १३. | श्री. जुबेर इनामदार | सदस्य |

**गैरहजर सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| २. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ३. | श्रीम. वंदना विकास पाटील | सदस्या |

**नगरसचिव :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शनिवार दि. २९/१२/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय , दुसरा मजला, लालबहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १५ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.** प्रकरण क्र. १६०, **दि. ०३/११/२०१८ रोजीच्या मा. विशेष स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**राकेश शाह :-**

दि. ०३/११/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**वर्षा भानुशाली :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १६० :-**

**दि. ०३/११/२०१८ रोजीच्या मा. विशेष स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र. १३५ :-**

दि. ०३/११/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. राकेश शाह अनुमोदन :- सौ. वर्षा भानुशाली**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्रमांक एक नंबर जम्प झालेला आहे. म्हणून मगाशी मी १५९ वाचले होते. ॲक्च्युअली १६० आपण वाचायचे आहे आणि त्याच्याप्रमाणेच पुढचे पण बदलतील. एक नंबर प्रमाणे. प्रकरण क्र. १६१, **स्थानिक संस्था कर विभागातील तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत असलेल्या ऑडीट लिपीकांच्या नियुक्तीचे नवीकरण करणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १४/१२/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. १४१)**

**धृवकिशोर पाटील :-**

श्री. अविनाश जाधव साहेब स्थानिक संस्था कराची आपली वसुली आहे. त्या वसुलीचे काम चालु आहे की नाही?

**अविनाश जाधव :-**

चालू आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

आजपर्यंत किती वसुली झाली?

**अविनाश जाधव :-**

७ लाखापर्यंत झालेली आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

जुबेरजी उस टाईम आप बोले ३ करोड की वसुली हुई है। ७ लाख रुपये वसुली हुई है।

**जुबेर इनामदार :-**

माझ्याकडे जमा खर्च नाही. त्याच्यामध्ये कुठे दाखवलेले आहे.

**अविनाश जाधव :-**

साहेब आता स्थानिक संस्था कर बंद झालेले आहे. आता आपले फक्त असेसमेंटचे काम चाललेले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ज्या व्यापाऱ्यांना आपले स्थानिक संस्था कर भरलेला आहे. त्या उरलेल्या स्थानिक संस्था कराचे त्यांनी योग्य भरलेले आहे की नाही आणि आपण त्यांच्याकडून निर्धारण करुन घेतो. त्यांच्याकडून आपण रिटर्न भरुन घेतो आणि त्याचे निर्धारण करतो.

**धृवकिशोर पाटील :-**

जाधव साहेब माझा प्रश्न फक्त एवढाच आहे की ३ करोडची वसुली आहे का ७ लाखाची वसुली आहे. मला फक्त तेवढेच उत्तर द्या.

**जुबेर इनामदार :-**

जमा खर्च बेलवटे साहेबांकडे असेल ना.

**धृवकिशोर पाटील :-**

जाधव साहेब माझा तुम्हाला काय प्रश्न होता. वसुली किती झाली?

**अविनाश जाधव :-**

७ लाख.

**धृवकिशोर पाटील :-**

मागे मिटींगमध्ये असे झाले होते की, वसुली अंदाजे ३ करोड रुपये झालेली आहे. तुम्हाला मी आता विचारले तुमची वसुली फकत ७ लाख. भरपूर मोठी तफावत आहे. साहेब आपण ह्या लोकांना पगार देतो.

यांच्याकडून काम करुन घेणे आपले आहे की नाही. तुम्ही त्या विभागाचे जबाबदार अधिकारी आहेत. काम करणे तुमची जबाबदारी आहे. ज्यावेळी मागे बजेटची मिटींग झाली त्या बजेटच्या मिटींगमध्ये कमीत कमी ६ ते ७ सन्मा. सदस्यांनी एवढे पैसे भरले होते. म्हणजे याचा अर्थ भरपूर पैसे बाकी आहेत ना. अतिरिक्त आयुक्त साहेब, स्थानिक संस्था कराची भरपूर वसुली पेंडींग आहे. आणि त्यासाठी आपण यांना पण जबाबदार आहेत आणि आपले ५ ऑडिट लिपिक पण आहेत. आपण त्या लोकांकडून हे काम करुन घेतले पाहिजे आणि दुसरी गोष्ट हे लोक पाच महिन्यापासून ह्या लोकांना पगार दिला नाही. म्हसाळ साहेब आहेत का? उपायुक्त साहेब ५ महिन्यापासून हे लोक पगार घेत नाही. यांना पगार दिलाच नाही. बिचारे गरीब लोकं आहेत, गरीब कर्मचारी आहेत. पाच महिन्यापासून ते लोक बिनपगारी काम करीत आहेत आणि त्यांना आपण अशी मंजुरी पण दिली नाही. उद्या जर समजा चुकुन एखादा अपघात घडला तर काय होईल की आपण बोलणार की ते आपल्याकडे काम करत नाही आणि ते बोलणार की मी यांच्याकडे काम करतो. असे व्हायला नको म्हणून पूढच्या वेळी हा जो प्रस्ताव आहे वेळेमध्ये सादर झाला पाहिजे. तर साहेब तुम्ही असे निर्देश द्या. स्थानिक संस्था कर विभागात तात्पुरत्या स्वरुपात ऑडीट लिपीक या पदावर किमान वेतन रु.१५,३९३/- या ठोक मानधनावर कार्यरत आहेत. ०५ ऑडीट लिपीक यांची मुदत दि.१६/०८/२०१८ रोजी संपुष्टात आली आहे. सदर कर्मचा-यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्मचा-यांची नावे | पदनाम | मुदत संपण्याची दिनांक | नवीकरण कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. सचिन सुपूगडे | ऑडीट लिपीक | दि. १६/०८/२०१८ | दि.२०/०८/२०१८ ते दि.१९/०२/२०१९ |
| २. | श्री. सुशांत सुर्वे | ऑडीट लिपीक | दि. १६/०८/२०१८ | दि.२०/०८/२०१८ ते दि.१९/०२/२०१९ |
| ३. | श्रीम. हेमाली बावकर | ऑडीट लिपीक | दि. १६/०८/२०१८ | दि.२०/०८/२०१८ ते दि.१९/०२/२०१९ |
| ४. | श्री. रविनाथ शिवगण | ऑडीट लिपीक | दि.१६/०८/२०१८ | दि.२०/०८/२०१८ ते दि.१९/०२/२०१९ |
| ५. | श्रीम. निशा पटेल | ऑडीट लिपीक | दि. १६/०८/२०१८ | दि.२०/०८/२०१८ ते दि.१९/०२/२०१९ |

सदर बाबत सहा.आयुक्त (कर), परिवहन उप-व्यवस्थापक, उप-आयुक्त (आरोग्य) तसेच सहा.आयुक्त (स्थानिक संस्था कर) यांनी ०५ ऑडीट लिपीक कर्मचा-यांची यापुढेही आवश्यकता असल्याने मुदतवाढीसाठी लेखी शिफारस केली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार नेमणुकीच्या नवीकरणासाठी मा. स्थायी समितीपुढे ठेवून मंजुरी घेणे अनिवार्य आहे.

सबब सदर ०५ ऑडीट लिपीक यांची मुदत दि.१६/०८/२०१८ रोजी संपूष्टात आली असल्याने दि.१७/०८/२०१८ रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने दि.१८/०८/२०१८ रोजी एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.१४/१२/२०१८ पर्यंत कार्योत्तर मंजुरी व पुढे दि.१९/०२/२०१९ पर्यंतच्या कालावधीकरीता नव्याने नवीकरण करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**हसमुख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

अतिरिक्त आयुक्त साहेब या विषयावर जबाबदारी निश्चित करा. प्रत्येक विभाग यांना अशाप्रकारे मानधनावर किंवा बाहेरुन आपल्याला अधिकारी कर्मचारी घ्यावे लागतात ही एक पध्दत झालेली आहे. प्रचलित पध्दत होऊन चाललेली आहे की ४-५ महिने २-४ महिने उलटल्यानंतर हा विषय प्रस्ताव आपल्याकडे येतो. याची जबाबदारी निश्चित करा. व्यक्तिगत वेस्टेड इंट्रेस्ट ज्या विषयामध्ये असला की तो बरोबर वेळेवर पाठवला जातो. आणि असे जे प्रस्ताव असतात याला असे का विलंब का? त्याला कारण असायला पाहिजे. निवडणूका आहेत, आचार संहिता आहेत. हा विषय वेगळा आहे हे समजू शकतो. तो तुमच्या गोषवा-यामध्ये सुध्दा विषय आहे. म्हणजे आम्हाला तुम्ही कुठेतरी दोषी करता हा विषय पारित करुन हे आम्हाला ही अडचणीचे आहे. सदस्यांनाही अडचणीचे आहे.

**दिप्ती भट :-**

सभापती साहेब आपल्या परवानगीने बोलते, साहेब आपण परवानाचे जे टेंडर दिलेले आहे. सर्व दुकानवाल्यांचे आपण परवाना काढतो असे नविन टेंडर दिले गेले आहे असे मला वाटते. ४ मिटींगच्या आधी हे डिसाईड केले गेले आहे. ५०० रुपयाच्या हिशोबाने त्यांची स्क्वेअर फुटच्या हिशोबाने आपण त्याचे पैसे घेतो. आपण जे टेंडर दिले आहे ते टेंडर पध्दतीत जे लोक आहेत ते सर्व व्यापारीकडून हजार हजार रुपये एक्स्ट्रा घेतात म्हणजे आपण त्यांना ते कामच दिलेले आहे ते लिगली आहे का? तिथे जाऊन त्यांचे पेपर घेऊन सबमिट करुन त्यांना परवाना द्यायचा आहे. पण आपण त्यांना हजार रुपये एक्स्ट्रा त्यांच्याकडून आणून देतो. तर ते त्यांचे कामच आहे. मग हजार रुपये एक्स्ट्रा पब्लीककडून जे व्यापारी आहेत, दुकानवाले त्यांच्याकडून का घेतात.

**मा. सभापती :-**

साहेब तुम्ही याच्यामध्ये जरा चौकशी करा आणि जर तसे असेल तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करा.

**दिप्ती भट :-**

८ दिवसात ही प्रोसेस कम्पलीट होते. त्यांना भेटते पैसे भरल्यानंतर पण दोन महिन्यापर्यंत त्यांना फक्त ते पावती देऊन जातात. पण त्यांचे पेपर देत नाहीत ते त्यांना द्यायला सांगा.

**वर्षा भानुशाली :-**

सर हे जे संगणक चालक आहेत यांना आपण परत घेतलेले आहे. त्यांना पाच महिन्याचा पगार तुम्ही देणार आहात की नाही. ते आपल्याकडे कार्यरत होते.

**मा. सभापती :-**

ते द्यावे लागेल.

**वर्षा भानुशाली :-**

माझी अशी सुचना आहे की त्यांना ५ महिन्याचा पगार आपण द्यावा.

**मा. सभापती :-**

पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १६१ :-**

**स्थानिक संस्था कर विभागातील तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत असलेल्या ऑडीट लिपीकांच्या नियुक्तीचे नवीकरण करणेबाबत . ( मा. स्थायी समिती सभा दि . १४/१२/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. १४१)**

**ठराव क्र. १३६ :-**

स्थानिक संस्था कर विभागात तात्पुरत्या स्वरुपात ऑडीट लिपीक या पदावर किमान वेतन रु.१५,३९३/- या ठोक मानधनावर कार्यरत आहेत. ०५ ऑडीट लिपीक यांची मुदत दि.१६/०८/२०१८ रोजी संपुष्टात आली आहे. सदर कर्मचा-यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्मचा-यांची नावे | पदनाम | मुदत संपण्याची दिनांक | नवीकरण कालावधी |
|---|---|---|---|---|
| ६. | श्री. सचिन सुपूगडे | ऑडीट लिपीक | दि. १६/०८/२०१८ | दि.२०/०८/२०१८ ते दि.१९/०२/२०१९ |
| ७. | श्री. सुशांत सुर्वे | ऑडीट लिपीक | दि. १६/०८/२०१८ | दि.२०/०८/२०१८ ते दि.१९/०२/२०१९ |
| ८. | श्रीम. हेमाली बावकर | ऑडीट लिपीक | दि. १६/०८/२०१८ | दि.२०/०८/२०१८ ते दि.१९/०२/२०१९ |
| ९. | श्री. रविनाथ शिवगण | ऑडीट लिपीक | दि.१६/०८/२०१८ | दि.२०/०८/२०१८ ते दि.१९/०२/२०१९ |
| १०. | श्रीम. निशा पटेल | ऑडीट लिपीक | दि. १६/०८/२०१८ | दि.२०/०८/२०१८ ते दि.१९/०२/२०१९ |

सदर बाबत सहा.आयुक्त (कर), परिवहन उप-व्यवस्थापक, उप-आयुक्त (आरोग्य) तसेच सहा.आयुक्त (स्थानिक संस्था कर) यांनी ०५ ऑडीट लिपीक कर्मचा-यांची यापुढेही आवश्यकता असल्याने मुदतवाढीसाठी लेखी

शिफारस केली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार नेमणुकीच्या नवीकरणासाठी मा. स्थायी समितीपुढे ठेवून मंजुरी घेणे अनिवार्य आहे.

सबब सदर ०५ ऑडीट लिपीक यांची मुदत दि.१६/०८/२०१८ रोजी संपूष्टात आली असल्याने दि.१७/०८/२०१८ रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने दि.१८/०८/२०१८ रोजी एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.१४/१२/२०१८ पर्यंत कार्योत्तर मंजुरी व पुढे दि.१९/०२/२०१९ पर्यंतच्या कालावधीकरीता नव्याने नवीकरण करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. धृवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. हसमुख गेहलोत**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १६२, **मिरा भाईंदर महानगरपालिका शहर फेरीवाला सर्व्हेक्षण बाबतची निविदा मा. स्थायी समितीसमोर ठेवणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १४/१२/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. १४२)**

**मा. सभापती :-**

हा विषय नंतर घेण्यात यावा. पुढचा विषय घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १६३, **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नविन नळजोडणी संगणक आज्ञावलीची वाढ , सपोर्ट, हॉस्टींग व स्टोरेज इत्यादी आवश्यक कामे मे . NP Infoserve Technologies Pvt Lmt या संस्थेमार्फत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) मधील प्रकरण 5(2)(2) अन्वये मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १४/१२/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. १४४)**

**राकेश शाह :-**

मिरा भाईंदर शहराची सद्याची पाण्याची मागणी व होणारा पाणी पुरवठा यातील तफावत तसेच सन २०२१ पर्यंतची पाण्याची मागणी पूर्ण होण्यासाठी मंजूर अतिरिक्त ७५ द.ल.ली. पाणी शहरापर्यंत आणणेकरिता महाराष्ट्र शासनाच्या सुवर्ण जयंती महाअभियांनाअंतर्गत योजनेची कामे प्रगती पथावर आहेत. अतिरिक्त पाणी शहरास प्राप्त होत असल्याने शहरात नविन जलजोडणी मंजुरी दि.३०/०४/२०१७ पासून सुरु करण्यात आलेली आहे. नवीन जलजोडणी मंजुरी कामाबाबत नविन संगणक आज्ञावली खरेदी केलेली असुन त्यामध्ये ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने नळजोडणी अर्ज स्विकारणे, नळजोडणीस मंजुरी देणे इ. बाबी अंर्तभूत आहेत. नविन नळजोडणीसाठी मे. **NP Infoserve Technologies Pvt Ltd** यांची संगणक आज्ञावली कार्यान्वित असून सदर संगणक आज्ञावलीत बदल करावयाचे असल्यास त्याच संस्थेकडून करणे योग्य राहील.

सद्यस्थितीत मे. **NP Infoserve Technologies Pvt Ltd** या कंपनीची संगणक अज्ञावली योग्य प्रकारे कार्यान्वित असुन विभागाने सुचविलेल्या सुचनांनुसार व आवश्यकतेनुसार खालीलप्रमाणे संगणक आज्ञावलीत बदल करावयाचे आहेत.

| Sr. No. | Requirement | Rate |
|---|---|---|
| A) | Upgrade of Online water Connection approval System for one year as per department requirements. | 3,45,000/- |
| B) | Support for all users call and Master data Management for one year | 2,50,000/- |
| C) | Hosting and Storage of data and all the file uploaded including Domain for one year. | 2,50,000/- |
| | GST | 1,52,100/- |
| | **Total** | **9,97,100/-** |

सदर कामाकरीता मे. **NP Infoserve Technologies Pvt Ltd** यांचेकडे काम करणेस दर मागविले असता सदर कामासाठी रु.९,९७,१००/- इतक्या रक्कमेत करणेस समर्थता दर्शविलेली आहे. महानगरपालिकेच्या संगणक विभागाने उपरोक्त दरांची तपासणी करुन उपरोक्त दर शासन दरानुसार वाजवी असल्याचा अभिप्राय दिलेला आहे.

तरी वरीलप्रमाणे मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नविन नळजोडणी संगणक आज्ञावलीची वाढ, सपोर्ट, हॉस्टींग व स्टोरेज इत्यादी आवश्यक कामे करणे हे काम अत्यावश्यक असल्याने या कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची (ड) मधील प्रकरण ५(२)(२) अन्वये सदर कामासाठी रक्कम रु.९,९७,१००/- (अक्षरी नऊ लाख सत्याण्णव हजार शंभर मात्र) या रक्कमेस आर्थिक व प्रशासकिय मान्यता हि सभा देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**वर्षा भानुशाली :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १६३ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नविन नळजोडणी संगणक आज्ञावलीची वाढ , सपोर्ट, हॉस्टींग व स्टोरेज इत्यादी आवश्यक कामे मे . NP Infoserve Technologies Pvt Lmt या संस्थेमार्फत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) मधील प्रकरण 5(2)(2) अन्वये मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १४/१२/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. १४४)**

**ठराव क्र. १३८ :-**

मिरा भाईंदर शहराची सद्याची पाण्याची मागणी व होणारा पाणी पुरवठा यातील तफावत तसेच सन २०२१ पर्यंतची पाण्याची मागणी पूर्ण होण्यासाठी मंजूर अतिरिक्त ७५ द.ल.ली. पाणी शहरापर्यंत आणणेकरिता महाराष्ट्र शासनाच्या सुवर्ण जयंती महाअभियांनाअंतर्गत योजनेची कामे प्रगती पथावर आहेत. अतिरिक्त पाणी शहरास प्राप्त होत असल्याने शहरात नविन जलजोडणी मंजुरी दि.३०/०४/२०१७ पासून सुरु करण्यात आलेली आहे. नवीन जलजोडणी मंजुरी कामाबाबत नविन संगणक आज्ञावली खरेदी केलेली असुन त्यामध्ये ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने नळजोडणी अर्ज स्विकारणे, नळजोडणीस मंजुरी देणे इ. बाबी अंर्तभूत आहेत. नविन नळजोडणीसाठी मे. **NP Infoserve Technologies Pvt Ltd** यांची संगणक आज्ञावली कार्यान्वित असून सदर संगणक आज्ञावलीत बदल करावयाचे असल्यास त्याच संस्थेकडून करणे योग्य राहील.

सद्यस्थितीत मे. **NP Infoserve Technologies Pvt Ltd** या कंपनीची संगणक अज्ञावली योग्य प्रकारे कार्यान्वित असुन विभागाने सुचविलेल्या सुचनांनुसार व आवश्यकतेनुसार खालीलप्रमाणे संगणक आज्ञावलीत बदल करावयाचे आहेत.

| Sr. No. | Requirement | Rate |
|---|---|---|
| A) | Upgrade of Online water Connection approval System for one year as per department requirements. | 3,45,000/- |
| B) | Support for all users call and Master data Management for one year | 2,50,000/- |
| C) | Hosting and Storage of data and all the file uploaded including Domain for one year. | 2,50,000/- |
| | GST | 1,52,100/- |
| | **Total** | **9,97,100/-** |

सदर कामाकरीता मे. **NP Infoserve Technologies Pvt Ltd** यांचेकडे काम करणेस दर मागविले असता सदर कामासाठी रु.९,९७,१००/- इतक्या रक्कमेत करणेस समर्थता दर्शविलेली आहे. महानगरपालिकेच्या संगणक विभागाने उपरोक्त दरांची तपासणी करुन उपरोक्त दर शासन दरानुसार वाजवी असल्याचा अभिप्राय दिलेला आहे.

तरी वरीलप्रमाणे मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नविन नळजोडणी संगणक आज्ञावलीची वाढ, सपोर्ट, हॉस्टींग व स्टोरेज इत्यादी आवश्यक कामे करणे हे काम अत्यावश्यक असल्याने या कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची (ड) मधील प्रकरण ५(२)(२) अन्वये सदर कामासाठी रक्कम रु.९,९७,१००/- (अक्षरी नऊ लाख सत्याण्णव हजार शंभर मात्र) या रक्कमेस आर्थिक व प्रशासकिय मान्यता हि सभा देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. राकेश शाह अनुमोदन :- सौ. वर्षा भानुशाली**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १६४, **मिरा भाईंदर महानगरपालिका Cloud Computing Policy-Emplanelment of Cloud Service Providers and Guildelines for Government organization कामी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. (संगणक विभाग)**

**धृवकिशोर पाटील :-**

मिरा- भाईंदर महानगरपालिकेने संपूर्ण माहितीसह सदरचा विषय फेर सादर करावा, असा ठराव मांडत आहे. महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने **Cloud Computing Policy-Empanelment of Cloud Service Providers and Guidelines for Government organizations** कामी महाराष्ट्र शासन माहिती तंत्रज्ञान परिपत्रक क्र.मातंसं- **060/3/2017/3** दि.०४/०८/२०१८ अन्वये सर्व शासकीय विभागासाठी परिपत्रक निर्गमित केलेले आहे. याबाबत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध संगणक आज्ञावली करिता **Cloud services** सेवेबाबत तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Env. | Hosting Components | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **A.1** | **eNlight Cloud Hosting** | **Unit** | **Cost/Unit** | **MRC** | **Comment** |
| **DIT Pack 34** | PRD Web Server (DC+DR)<br>OS : Ubuntu\| vCores : 16 \| RAM : 64 GB \| Disk Space : 950 GB | 1 NO | INR 39,150 | INR 39,150 | Inclusive of 1 Public IP, 100GB Backup Space, Operating System - This is the basic VM config as per client requirement |
| **DIT Pack 34** | PRD App Server (DC+DR)<br>OS : Ubuntu\| vCores : 16 \| RAM : 64 GB \| Disk Space : 950 GB | 1 NO | INR 39,150 | INR 39,150 | Inclusive of 1 Public IP, 100GB Backup Space, Operating System - This is the basic VM config as per client requirement |
| **DIT Pack 34** | PRD DB Server<br>OS : Ubuntu\| vCores : 16 \| RAM : 64 GB \| Disk Space : 950 GB | 1 NO | INR 39,150 | INR 39,150 | Inclusive of 1 Public IP, 100GB Backup Space, Operating System - This is the basic VM config as per client requirement |
| **DIT Pack 34** | PRD DB Server<br>OS : Ubuntu\| vCores : 16 \| RAM : 64 GB \| Disk Space : 950 GB | 1 NO | INR 39,150 | INR 39,150 | Inclusive of 1 Public IP, 100GB Backup Space, Operating System - This is the basic VM config as per client requirement |
| **A.2** | **Additional Infrastrucutre and Software Licenses** | **Unit** | **Cost/Unit** | **MRC** | **Comment** |
| **DB** | MySQL Community / PostgreSQL Community | 2 NO | Included | Included | |
| **MAILING** | Email - 1 account with 10GB Mailbox | 40 NO | INR 70 | INR 2,800 | 15 GB Storage to be added additionally |
| **A.3** | **Additonal Storage & Backup Plan** | **Unit** | **Cost/Unit** | **MRC** | **Comment** |
| **Backup** | Backup Services (Backup Agent, Backup Monitoring and Restoration, Backup Management) | 4 NO | INR 2,500 | INR 10,000 | For App/DB, 2 DC/2 DR |
| **Backup Storage** | Additional Storage | 3 TB | INR 1,500 | INR 4,500 | |
| **A.4** | **Network & Connectivity** | **Unit** | **Cost/Unit** | **MRC** | **Comment** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | Internet Bandwidth (Unlimited Data) - DC - 50 Mbps | 1 NO | INR 37,700 | INR 37,700 | As per Tier 1 CSP rates |
| | Internet Bandwidth (Unlimited Data) - DR - 5 Mbps | 1 NO | INR 3,770 | INR 3,770 | As per Tier 1 CSP rates |
| | Monitoring Dashboard (Per Device/ Instance) | 4 NO | INR 300 | INR 1,200 | |
| | SSL VPN | 2 NO | INR 300 | INR 600 | |
| | Data Sync Charges | 1 TB | INR 2,500 | INR 2,500 | Need to confirm on the amount of data being generated per day to replicate to DR site |
| **A.5** | **Security Components** | **Unit** | **Cost/Unit** | **MRC** | **Comment** |
| **Services** | vFirewall | 2 NO | Included | Included | |
| **Services** | vWAF | 2 NO | Included | Included | |
| **Services** | Anti-virus | 3 NO | Included | Included | |
| **A.6** | **Managed Hosting Services** | **Unit** | **Cost/Unit** | **MRC** | **Comment** |
| **Services** | DNS Management Services | 1 NO | INR 75 | INR 75 | |
| | Managed services for OS, DB, Network, Storage | 1 Job | INR 10,987 | INR 10,987 | |
| | | | | | |
| **No.** | **DESCRIPTION** | | | **MRC** | |
| **1** | **Infrastructure (A.1 + A.2 + A.3 + A.4 + A.5)** | | | **INR 2,19,670** | |
| **2** | **Managed Services (A.6)** | | | **INR 11,062** | |
| | **Total Monthly Service Pay Without Taxes (A.1 + A.2 + A.3 + A.4 + A.5 + A.6)** | | | **INR 2,30,732** | |

शासनाच्या परिपत्रकानुसार **Empanelment Company** कडुन दि.३०/०४/२०२१ पर्यंत मंजूर दर उपलब्ध आहेत. यामध्ये **DC, DR, Backup Services,** ४० शासकीय **Domain email Account** सेवेचा समावेश आहे. डाटा सुरक्षिततेच्या दृष्टीने महापालिकेच्या विविध विभागांच्या संगणक आज्ञावली व डाटा सुरक्षितपणे **hosting** करणेकामी शासनाने **M/s.ESDS Empanelment** केलेल्या कंपनीकडून **Cloud services** सेवा घेणे उचित वाटते.

**Cloud Computing Policy-Empanelment of Cloud Service Providers and Guidelines for Government organizations** कामी अंदाजे रु.२,३०,७३२/- **(Excluding GST)** मासिक खर्च अपेक्षित आहे. याकामी **M/s.ESDS** यांच्याकडून एक वर्षाकरिता वरीलप्रमाणे सेवा पूरवठा करणेस मा. स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**हसमुख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर. तो फेरिवाल्यांचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १६४ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका Cloud Computing Policy-Emplanelment of Cloud Service Providers and Guildelines for Government organization कामी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. (संगणक विभाग)**

**ठराव क्र. १३९ :-**

मिरा- भाईंदर महानगरपालिकेने संपूर्ण माहितीसह सदरचा विषय फेर सादर करावा, असा ठराव मांडत आहे. महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने **Cloud Computing Policy-Empanelment of Cloud Service Providers and Guidelines for Government organizations** कामी महाराष्ट्र शासन माहिती तंत्रज्ञान परिपत्रक क्र.मातंसं- **060/3/2017/3** दि.०४/०८/२०१८ अन्वये सर्व शासकीय विभागासाठी परिपत्रक निर्गमित केलेले आहे. याबाबत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध संगणक आज्ञावली करिता **Cloud services** सेवेबाबत तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Env. | Hosting Components | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **A.1** | **eNlight Cloud Hosting** | **Unit** | **Cost/Unit** | **MRC** | **Comment** |
| **DIT Pack 34** | PRD Web Server (DC+DR)<br>OS : Ubuntu\| vCores : 16 \| RAM : 64 GB \| Disk Space : 950 GB | 1 NO | INR 39,150 | INR 39,150 | Inclusive of 1 Public IP, 100GB Backup Space, Operating System - This is the basic VM config as per client requirement |
| **DIT Pack 34** | PRD App Server (DC+DR)<br>OS : Ubuntu\| vCores : 16 \| RAM : 64 GB \| Disk Space : 950 GB | 1 NO | INR 39,150 | INR 39,150 | Inclusive of 1 Public IP, 100GB Backup Space, Operating System - This is the basic VM config as per client requirement |
| **DIT Pack 34** | PRD DB Server<br>OS : Ubuntu\| vCores : 16 \| RAM : 64 GB \| Disk Space : 950 GB | 1 NO | INR 39,150 | INR 39,150 | Inclusive of 1 Public IP, 100GB Backup Space, Operating System - This is the basic VM config as per client requirement |
| **DIT Pack 34** | PRD DB Server<br>OS : Ubuntu\| vCores : 16 \| RAM : 64 GB \| Disk Space : 950 GB | 1 NO | INR 39,150 | INR 39,150 | Inclusive of 1 Public IP, 100GB Backup Space, Operating System - This is the basic VM config as per client requirement |
| **A.2** | **Additional Infrastrucutre and Software Licenses** | **Unit** | **Cost/Unit** | **MRC** | **Comment** |
| **DB** | MySQL Community / PostgreSQL Community | 2 NO | Included | Included | |
| **MAILING** | Email - 1 account with 10GB Mailbox | 40 NO | INR 70 | INR 2,800 | 15 GB Storage to be added additionally |
| **A.3** | **Additonal Storage & Backup Plan** | **Unit** | **Cost/Unit** | **MRC** | **Comment** |
| **Backup** | Backup Services (Backup Agent, Backup Monitoring and Restoration, Backup Management) | 4 NO | INR 2,500 | INR 10,000 | For App/DB, 2 DC/2 DR |
| **Backup Storage** | Additional Storage | 3 TB | INR 1,500 | INR 4,500 | |
| **A.4** | **Network & Connectivity** | **Unit** | **Cost/Unit** | **MRC** | **Comment** |
| | Internet Bandwidth (Unlimited Data) - DC - 50 Mbps | 1 NO | INR 37,700 | INR 37,700 | As per Tier 1 CSP rates |
| | Internet Bandwidth (Unlimited Data) - DR - 5 Mbps | 1 NO | INR 3,770 | INR 3,770 | As per Tier 1 CSP rates |
| | Monitoring Dashboard (Per Device/ Instance) | 4 NO | INR 300 | INR 1,200 | |
| | SSL VPN | 2 NO | INR 300 | INR 600 | |
| | Data Sync Charges | 1 TB | INR 2,500 | INR 2,500 | Need to confirm on the amount of data being generated per day to replicate to DR site |
| **A.5** | **Security Components** | **Unit** | **Cost/Unit** | **MRC** | **Comment** |
| **Services** | vFirewall | 2 NO | Included | Included | |
| **Services** | vWAF | 2 NO | Included | Included | |
| **Services** | Anti-virus | 3 NO | Included | Included | |
| **A.6** | **Managed Hosting Services** | **Unit** | **Cost/Unit** | **MRC** | **Comment** |
| **Services** | DNS Management Services | 1 NO | INR 75 | INR 75 | |
| | Managed services for OS, DB, Network, Storage | 1 Job | INR 10,987 | INR 10,987 | |
| | | | | | |
| **No.** | **DESCRIPTION** | | | **MRC** | |
| **1** | **Infrastructure (A.1 + A.2 + A.3 + A.4 + A.5)** | | | **INR 2,19,670** | |
| **2** | **Managed Services (A.6)** | | | **INR 11,062** | |
| | **Total Monthly Service Pay Without Taxes (A.1 + A.2 + A.3 + A.4 + A.5 + A.6)** | | | **INR 2,30,732** | |

शासनाच्या परिपत्रकानुसार **Empanelment Company** कडुन दि.३०/०४/२०२१ पर्यंत मंजूर दर उपलब्ध आहेत. यामध्ये **DC, DR, Backup Services,** ४० शासकीय **Domain email Account** सेवेचा समावेश आहे. डाटा सुरक्षिततेच्या दृष्टीने महापालिकेच्या विविध विभागांच्या संगणक आज्ञावली व डाटा

सुरक्षितपणे **hosting** करणेकामी शासनाने **M/s.ESDS Empanelment** केलेल्या कंपनीकडून **Cloud services** सेवा घेणे उचित वाटते.

**Cloud Computing Policy-Empanelment of Cloud Service Providers and Guidelines for Government organizations** कामी अंदाजे रु.२,३०,७३२/- **(Excluding GST)** मासिक खर्च अपेक्षित आहे. याकामी **M/s.ESDS** यांच्याकडून एक वर्षाकरिता वरीलप्रमाणे सेवा पूरवठा करणेस मा. स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. धृवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. हसमुख गेहलोत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १६२, **मिरा भाईंदर महानगरपालिका शहर फेरीवाला सर्व्हेक्षण बाबतची निविदा मा. स्थायी समितीसमोर ठेवणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १४/१२/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. १४२)**

**जुबेर इनामदार :-**

मी ह्या विषयावर काही प्रश्न उपस्थित केले होते. सर्व्हेक्षण करताना नविन जे लोक बसतील त्यांची शहानिशा कशी होणार? हा विषय आपण तहकुब केला होता. त्याची माहिती मागितली होती ती माहिती सभागृहाला देण्यांत यावी.

**मा. सभापती :-**

याच्यामध्ये आपण सर्व्हेक्षण कमिटीला तसे सांगितले आहे. ठरावामध्ये तसे नमुद केलेले आहे. फेरिवाल्यांची डिटेल आपल्याला घ्यायची आहे. त्याठिकाणी ते किती दिवसापासून व्यवसाय करत आहेत ते मिरा भाईंदरचे स्थानिक आहेत किंवा ते कुठे राहतात. त्यांचे सर्व पुरावे रेसिडेन्शीयल प्रुफ, कामाचे प्रुफ सर्व आपण तसे ठरावात नमुद केलेले आहे. सर्व डेटा आपल्याकडे आल्यानंतर आपण धोरण निश्चित करु.

**जुबेर इनामदार :-**

तो ह्या शहराचा असला पाहिजे. तो सर्व्हेक्षणाचा भाग आहे. तो फेरिवाला धोरणाचा भागच आहे. सद्यस्थिती आता तो किती वर्षापासून तिथे उभा आहे. कारण हा विषय तुमच्याकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर सर्व्हेक्षण करणारे ह्या शहरामध्ये फिरणार आणि जे फेरिवाले त्यांना पालिकेचे कर्मचारी त्यांना त्यांची जाणीव देतील. नाही बसणारे लोक येऊन तिथे बसतील. सुरुवात करतील त्याचे काय?

**धृवकिशोर पाटील :-**

त्याच्यामध्ये जे कागदपत्र आहेत ते कागदपत्र तपासणार. त्याच्यात जे १-२ क्रायटेरीया आहे ते १० वर्षापासून की १५ वर्षापासून तो मिरा भाईंदरचा असायला पाहिजे. हे सर्व कागदपत्र तपासायचे आणि व्हेरीफाय करायचे.

**जुबेर इनामदार :-**

कागदपत्र तपासायची म्हणजे तो ह्या शहराचा नागरीक असायला पाहिजे. तो फेरिवाला धोरणाचाच आहे. सद्यस्थितीत तो फेरिवाला आहे की नाही.

**मा. सभापती :-**

तो किती दिवसापासून तिथे व्यवसाय करत आहे. त्याचे पण डिटेल्स घ्यायचे आणि ती पण इन्क्वायरी करायची तसे आपण त्यांना सांगितले आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

ते पण आपण करायला सांगितलेले आहे. त्याच्यामध्ये आपल्याकडे जो जूना रेकॉर्ड आहे. आपल्या महापालिकेनी सन २००६-०७ सर्व्हे .....

**जुबेर इनामदार :-**

२००७ ला नाही नंतर केला होता.

**धृवकिशोर पाटील :-**

तो सर्व्हे पण नंतर चेक करणार त्याच्या सगळ्याचे संगनमत करुन ते करणार आहेत. ह्याच्यामध्ये काही अटीशर्ती आहेत.

**मा. सभापती :-**

त्यांची काय सुचना असेल तर ती पण घ्या.

**धृवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील फेरीवाल्यांचे सर्व्हेक्षण करणेकामी ऑनलाईन ई-टेडरिंग व्दारे तसेच "मुंबई लक्षदीप" तसेच "सर्वश्रेष्ठ राजसत्ता" या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द् करण्यात आली होती. सदर निविदा दि.**07/09/2018** ते दि.**18/09/2018** रोजीपर्यंत निविदा मागविण्यांत आल्या होत्या. सदर मुदतीत एकुण **02** निविदा प्राप्त् झालेली असल्यामुळे सदर निविदेस दि.**27/09/2018** पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात आली होती व एकुण **05** निविदा प्राप्त् झाल्या आहेत. सदर निविदाधारकांनी निविदेसाठी आवश्यक् कागदपत्रे सादर केलेली असुन सदर निविदाधारकांचे फायनान्शीयल बीड खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | साय आयटी रिसोर्स लि. | मार्क इंटरप्रायजेस | अर्थव प्लानिंग ॲण्ड रिर्सच प्रा.लि. | ऑल इंडिया इनस्टिटयुट ऑफ लोकल सेल्फ् गर्वन्हमेंट | मॅगोज इंटरप्रायजेस | मॅगोज इंटरप्रायजेस यांनी वाटाघाटी अंती मान्यकेलेले दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | फेरीवाला सर्व्हेक्षण करणेकामी सादर केलेले दर | **153/-** | **149.50/-** | **175.52/-** | **276/-** | **118/-** | **114/-** |

सदर कमी दराच्या निविदामध्ये वाटाघाटी अंती मॅगोज इंटरप्रायजेस यांनी खालीलप्रमाणे दर मान्य केलेले आहेत.

| अ.क्र. | तपशिल | मॅगोज इंटरप्रायजेस | मॅगोज इंटरप्रायजेस यांनी वाटाघाटी अंती मान्यकेलेले दर |
|---|---|---|---|
| **1** | फेरीवाला सर्व्हेक्षण करणेकामी सादर केलेले दर | **118/-** | **114/-** |

संस्थेने सादर केलेला दर मान्य् करुन खालील अटीशर्तीस अधीन राहुन फेरीवाला सर्व्हेक्षण करावयाचे आहे.

1. निविदाकाराने प्रत्यक्ष जागेवर पाहणी करुनच फेरीवाला सर्व्हेक्षण करावयाचे आहे.
2. निविदाकाराने सर्व्हेक्षण करताना ओळखपत्रामध्ये फेरीवाला ठिकाणच्या क्षेत्रफळाचा स्पष्ट् उल्लेख करण्यात यावा.
3. निविदाकाराने सर्व्हेक्षण करताना रहिवास पुराव्याचे पुर्ण कागदपत्रे जमा करुन घेण्यात यावी.
4. फेरीवाला सर्व्हेक्षण पुर्ण झालेनंतर फेरीवाल्यांना ओळखपत्र वाटप केलेबाबतची खातरजमा झालेनंतर निविदाकारास सर्व्हेक्षणाची रक्कम अदा करावयाची आहे.
5. निविदाधारकाने सर्व्हेक्षण केलेनंतर पात्रा फेरीवाल्यांना ओळखपत्र वाटप केले असेल तर प्रति फेरीवाला रु.**114/-** प्रमाणे रक्कम अदा करण्यात यावी . व जे फेरीवाला पात्र नाहीत त्यांचे ओळखपत्र तयार करण्यासाठी लागणारा खर्च वगळून बाकी रक्कम अदा करावी असा मी ठराव मांडत आहे.

6. **प्रशासनाने घरोघरी जावुन फेरीवाल्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करावी. तसेच किती वर्षांपुसन व्यवसाय करीत आहेत याची विगतवारी करावी.**
7. **प्रशासनाने गुगल मॅपवर G.I.S. मॅपींग करावी.**
8. **वेगवेगळया व्यवसाय करणा-या (फळ विक्रेता, कपडेवाले, कटलरी, बुट-चप्पल विक्रते इत्यादी) फेरीवाल्यांची विगतवारी करावी.**

**राकेश शाह :-**

माझे अनुमोदन आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

फेरिवाल्यांचा प्रत्यक्ष सर्व्हे करायचा. सर्व्हे केला आणि त्याच्यामध्ये दुकान असतील आजूबाजूची लोक असतील त्यांना तो विचारणार आणि आपल्या महापालिकेमध्ये काय रेकॉर्ड असेल तर तो बघेल.

**राजीव मेहरा :-**

महापालिका में रेकॉर्ड कैसा रहेगा। २००८ का है। अब १० साल हो गया सेक्टर ५-६ में मे २०० फेरिवाले ६ महिने में पडे है।

**मा. सभापती :-**

ह्या ठरावामध्ये प्रशासनानी घरोघरी जाऊन फेरिवाल्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करावी. तसेच किती वर्षापासून व्यवसाय करीत आहेत ह्याची विगतवारी करावी. ते आपण त्यांना मेंशन केले ते आहेत. ती त्यांची जबाबदारी आहे. ते तशी क्लासिफाईड यादी देणार आहेत. फेरिवाला किती वर्षापासून किंवा हा नविन आहेत. आजपासून लावायला सुरुवात केली.

**जुबेर इनामदार :-**

किती जुना असायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

आज त्याच्यामध्ये चर्चा करत नाही.

**जुबेर इनामदार :-**

फेरिवाला चार दिवस आधी येऊन बसला की चार वर्ष जूना माणूस आहे. ह्याचे सर्वेक्षण कसे होणार? तेव्हाही आमचा हाच प्रश्न होता.

**धृवकिशोर पाटील :-**

तिथे जाऊन सर्व्हे करायचा विचारपूस करायची. मग काय केले पाहिजे?

**जुबेर इनामदार :-**

माझे पण तेच मत आहे ना. विषय कसा काढला पाहिजे. किंवा त्याच्याकडे पालिकेच्या जून्या पावत्या असाव्यात.

**धृवकिशोर पाटील :-**

त्याच्यामध्ये त्याचे नाव नसते. समजा माझ्याकडे पावती आहे पण त्याच्यात नाव नाही. त्याच्यापेक्षा माझे असे मत आहे की काही स्पॉटवर जाऊन सर्व्हे करायचा. दुकानदाराना विचारायचे...........

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेब सर्वेक्षण करायला जो ठेकेदार आला आहे. त्याला बोलवून घ्या. त्याच्याशी चर्चा करु. काही अडचण असेल तर अडचण आपल्याला होणारच आहे.

**मा. सभापती :-**

ठीक आहे.

**दिपाली पोवार :-**

सदरचे सर्वेक्षण वॉर्ड निहाय होणार आहे आणि त्याच्यामध्ये हाय कोर्टाच्या आदेशाप्रमाणे १/१/१४ पूर्वीचे जे फेरिवाले आहेत त्यांचे सर्वेक्षण करणे बंधनकारक आहे. आणि त्यांना जागा देणार ते बंधनकारक आहे. प्रत्येक वॉर्ड निहाय आपण सर्वेक्षण करणार आणि त्याची यादी महासभेकडून मंजूर करुन आपण ती हरकती सुचनासाठी प्रसिध्द करणार आहेत. त्याच्यामध्ये जे नविन आहेत ते हरकती सुचनांमध्ये येतील. प्रत्येक वॉर्ड निहाय ह्याचे सर्वेक्षण झालेले आहे. ते प्रत्येक नगरसेवकांच्या निर्दशनास येईल. तुम्ही त्याच्यात करेक्शन करु शकता.

**जुबेर इनामदार :-**

फेरिवाला बसतो तो नविन आहे की जुना आहे त्याच्या हरकती सुचना कोणी घ्यायच्या.

**धृवकिशोर पाटील :-**

आपण पदाधिकारी म्हणून जबाबदारी घेऊ शकतो. धृवकिशोरजी तूमचा प्रभाग नविन झाला आहे. तुमच्या प्रभागात जे फेरिवाले बसतात त्याचे चेहरे आठवतात का? की हा जूना आहे हा नविन आहे. तुम्हाला सांगता येईल का? आज हमारे बाप की तबियत ठीक नही इसलिए हम आके खडा हूँ अशी बोलणारी लोक आहेत. ह्याच्यासाठी त्याला बोलवून घ्या. चर्चा करा. हा विषय स्ट्रिक्टली फॉलो केला पाहिजे. नाहीतर अडचणीचा होणार आहे. तुमच्याकडे यादी येणार आहे. सर्व्हेक्षण आपल्याला करायचे आहे. त्या विषयाला विरोध नाही.

**धृवकिशोर पाटील :-**

दिपाली मॅडम मागे जे सर्व्हेक्षण केले आहे ते ह्याच्यात ग्राह्य धरणार आहात का?

**जुबेर इनामदार :-**

जुने सर्व्हेक्षण कधीचे आहे.

**दिपाली पोवार :-**

२०१० चा.

**जुबेर इनामदार :-**

म्हणजे ८ वर्ष उलटली. ८ वर्षामध्ये बाजार वसूलीमध्ये ४० ते ५० टक्के वाढ झाली आहे. ५० टक्के फेरिवाले वाढलेले आहेत. तेव्हा १०,००० किंवा १५,००० होते. आता ३०,००० झाले असतील.

**तारा घरत :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो ज्या स्थानिक महिला तिथे भाजी विकायला बसतात. काही सफाळा, पालघरवरुन येतात. ते १५ वर्षापासून बसतात. सफाळा पालघरवरुन येणाऱ्या महिलांकडे इकडचा पुरावा नाही. फक्त पावती आहे. पावती तर नगरपालिका घेते. मग त्याचे काय? भैया आले तर त्यांना जागा देणार. स्थानिक आणि सफाळा, पालघरवरुन येणारे त्यांचे काय?

**मा. सभापती :-**

ते आपण धोरण निश्चित करणार. आपले मिरा भाईंदरचे जे स्थानिक लोक आहेत त्यांना आपण प्राधान्य देऊ आणि २०-२० वर्षापासून आहेत. त्यांच्याबद्दल सहानुभूतीपूर्वक निर्णय घेऊ.

**जुबेर इनामदार :-**

सर्व्हेक्षण करणारे ठेकेदार अनुभवी असतील. त्यांनी कधीतरी काम केले असेल. त्यांना बोलवा त्यांच्याकडून ऐकूया विषय मंजूर, ना मंजूर करण्याचा विषय नाही. त्याला पण बोलवा. त्याचे काय म्हणणे आहे त्याचे काय इनपूट्स आहेत की कसे करता येईल.

**मा. सभापती :-**

ठीक आहे त्यासाठी एक मिटींग लावू.

**तारा घरत :-**

मार्केट झोन नाही तिथे पण वसूली होते. आमच्या इकडे मी मार्केट झोनची मागणी केली आहे. ते मार्केट झोन लवकर डिक्लेर करा.

**मा. सभापती :-**

विषय मंजूर.

**प्रकरण क्र. १६२ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका शहर फेरीवाला सर्व्हेक्षण बाबतची निविदा मा . स्थायी समितीसमोर ठेवणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १४/१२/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. १४२)**

**ठराव क्र. १३७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील फेरीवाल्यांचे सर्व्हेक्षण करणेकामी ऑनलाईन ई-टेडरिंग व्दारे तसेच “मुंबई लक्षदीप” तसेच “सर्वश्रेष्ठ् राजसत्ता” या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द् करण्यात आली होती. सदर निविदा दि.**07/09/2018** ते दि.**18/09/2018** रोजीपर्यंत निविदा मागविण्यांत आल्या होत्या. सदर मुदतीत एकुण **02** निविदा प्राप्त् झालेली असल्यामुळे सदर निविदेस दि.**27/09/2018** पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात

आली होती व एकुण **05** निविदा प्राप्त् झाल्या आहेत. सदर निविदाधारकांनी निविदेसाठी आवश्यक् कागदपत्रे सादर केलेली असुन सदर निविदाधारकांचे फायनान्शीयल बीड खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | साय आयटी रिसोर्स लि. | मार्क इंटरप्रायजेस | अर्थव प्लानिंग ॲण्ड रिर्सच प्रा.लि. | ऑल इंडिया इनस्टिटयुट ऑफ लोकल सेल्फ् गर्वन्हमेंट | मॅगोज इंटरप्रायजेस | मॅगोज इंटरप्रायजेस यांनी वाटाघाटी अंती मान्यकेलेले दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | फेरीवाला सर्व्हेक्षण करणेकामी सादर केलेले दर | **153/-** | **149.50/-** | **175.52/-** | **276/-** | **118/-** | **114/-** |

सदर कमी दराच्या निविदामध्ये वाटाघाटी अंती मॅगोज इंटरप्रायजेस यांनी खालीलप्रमाणे दर मान्य केलेले आहेत.

| अ.क्र. | तपशिल | मॅगोज इंटरप्रायजेस | मॅगोज इंटरप्रायजेस यांनी वाटाघाटी अंती मान्यकेलेले दर |
|---|---|---|---|
| **1** | फेरीवाला सर्व्हेक्षण करणेकामी सादर केलेले दर | **118/-** | **114/-** |

संस्थेने सादर केलेला दर मान्य् करुन खालील अटीशर्तीस अधीन राहुन फेरीवाला सर्व्हेक्षण करावयाचे आहे.

1. निविदाकाराने प्रत्यक्ष जागेवर पाहणी करुनच फेरीवाला सर्व्हेक्षण करावयाचे आहे.
2. निविदाकाराने सर्व्हेक्षण करताना ओळखपत्रामध्ये फेरीवाला ठिकाणच्या क्षेत्रफळाचा स्पष्ट् उल्लेख करण्यात यावा.
3. निविदाकाराने सर्व्हेक्षण करताना रहिवास पुराव्याचे पुर्ण कागदपत्रे जमा करुन घेण्यात यावी.
4. फेरीवाला सर्व्हेक्षण पुर्ण झालेनंतर फेरीवाल्यांना ओळखपत्र वाटप केलेबाबतची खातरजमा झालेनंतर निविदाकारास सर्व्हेक्षणाची रक्कम अदा करावयाची आहे.
5. निविदाधारकाने सर्व्हेक्षण केलेनंतर पात्रा फेरीवाल्यांना ओळखपत्र वाटप केले असेल तर प्रति फेरीवाला रु.**114/-** प्रमाणे रक्कम अदा करण्यात यावी . व जे फेरीवाला पात्र नाहीत त्यांचे ओळखपत्र तयार करण्यासाठी लागणारा खर्च वगळून बाकी रक्कम अदा करावी असा मी ठराव मांडत आहे.
6. **प्रशासनाने घरोघरी जावुन फेरीवाल्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करावी. तसेच किती वर्षांपुसन व्यवसाय करीत आहेत याची विगतवारी करावी.**
7. **प्रशासनाने गुगल मॅपवर G.I.S. मॅपींग करावी.**
8. **वेगवेगळया व्यवसाय करणा-या (फळ विक्रेता, कपडेवाले, कटलरी, बुट-चप्पल विक्रते इत्यादी) फेरीवाल्यांची विगतवारी करावी.**

**सुचक :- श्री. धृवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. राकेश शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १६५, **मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर पूर्व , भाईंदर पश्चिम, मिरारोड ते चेणा या विभागाच्या बाजार फी वसुली अभिकर्ता नियुक्ती बाबत.**

**धृवकिशोर पाटील :-**

भाईंदर पूर्व, भाईंदर पश्चिम व मिरारोड ते चेणा या परिसरातील फेरीवाल्यांकडुन बाजार फी वसूलीकामी सन २०१८-१९ करिता ई-ऑक्शन पध्दतीने लिलाव प्रक्रिया करणेकरिता दि. २२/०८/२०१८ रोजी जाहिर नोटीस प्रसिध्द करण्यात आली आहे. दरम्यानचे कालावधीत मा. महापौर सो. यांनी संदर्भिय पत्रान्वये सदर ई-ऑक्शन पुढील २/३ महिन्याकरिता स्थगीत करणेस सुचविले आहे. सदर पत्रामध्ये शहरामध्ये दि. १५/०८/२०१८ रोजी २ मार्केट बीओटी तत्वावर सुरु करण्यात आलेले असून येत्या २-३ महिन्यात आणखी ५ मार्केट बीओटी तत्वावर सुरु करण्यात येणार आहेत. व त्या परिसरातील मोठया संख्येने फेरीवाले सदर मार्केट मध्ये स्थलांतरित करण्याची योजना आहे. अशाप्रकारे सार्व. रस्त्यांवरील फेरीवाल्यांकरिता बीओटी तत्वावर मार्केट सुरु करण्याचे कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे सार्व. रस्त्यांवरील फेरीवाल्याची संख्या मोठया प्रमाणावर कमी होणार असल्याने पुढील २-३ महिने बाजार फी वसूली ठेक्याबाबत लिलाव प्रक्रिया स्थगीत ठेवावी व सध्या कार्यरत ठेकेदार यांचेकडुन बाजार फी वसूली सुरु ठेवावी तद्नंतर पुढील निर्णय घेणेबाबत मा. महापौर सो. यांनी दि. ३१/०८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले होते.

त्या अनुषंगाने प्रसिध्द करण्यात आलेले बाजार फी लिलाव (ई-ऑक्शन) प्रक्रिया स्थगीत करण्यात आलेली आहे. जरी नविन अभिकर्ता नियुक्त करण्याची प्रक्रिया स्थगीत केली असली तरी महानगरपालिका हद्दीत व्यवसाय करणारे फेरीवाले यांचेकडून बाजार फी वसूल करून महानगरपालिका फंडात जमा करणे अत्यावश्यक आहे.

तसेच पुढील नविन अभिकर्ता नियुक्त करावयाच्या कालावधीपर्यंत महानगरपालिकेच्या कर्मचारी यांचेकडून बाजार फी वसूली करावयाचे झाल्यास संपूर्ण परिसरातील फेरीवाले यांचेकडून बाजार फी वसूली करून महानगरपालिका फंडात जमा करून घेणेकरिता सदरकामी किमान ४० अधिकारी / कर्मचारी यांना पुर्णवेळाकरिता नियुक्त करावे लागेल. त्यामुळे कार्यालयीन कामकाजावर त्याचा परिणाम होईल.

भाईंदर (पुर्व) येथे नविन मार्केट व शेड बांधलेले असल्याने त्या ठिकाणी फेरीवाले मार्केट मध्येच व्यवसाय करीत असल्याने रकमेमध्ये ०% प्रशासकीय वाढ करावी. मिरोराड (पूर्व) येथे मार्केट उपलब्ध असुन पंरतु त्या ठिकाणी फेरीवाल्यांच्या संख्या प्रमाणे रकमेमध्ये ५% प्रशासकीय वाढ करण्यात यावी व भाईंदर (प.) येथे मार्केट उपलब्ध नसल्याने रकमेमध्ये १०% प्रशासकीय वाढ करणेस ही सभा मंजूरी देत आहे. सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या ठेकेदारास पुढील ६ महिने (दि. ०९/१०/२०१८ ते दि.०५/०४/२०१९ पर्यंत) च्या कालावधीकरिता ठरावाप्रमाणे ठेकेदारास मुदतवाढीचे कार्यादेश देऊन बाजार वसूली कार्यवाही सुरु ठेवावी, असा ठराव मांडत आहे.

**राकेश शाह :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

५ टक्के.

**धृवकिशोर पाटील :-**

अलग अलग है भाईंदर वेस्ट में १० टक्का है। उधर दो मार्केट ऑलरेडी किया है। मार्केट जो है उसका पैसा अलग से मिरा भाईंदर महानगरपालिका में जमा हो गया है।

**जुबेर इनामदार :-**

तुम्हाला माहित आहे की फेरिवाले वाढत चालले आहेत. कुठे कमी झाले आहेत. बाजार केल्यावर सुध्दा लोक बाहेर बसतात. ते तुम्हाला खुशीने १० टक्के देतील पालिकेच्या रेव्हेन्यूचा लॉस करता.

**धृवकिशोर पाटील :-**

आपली जी लोक आहेत त्यांना पालिकेने मार्केटमध्ये टाकले आहे आणि मार्केटच्या पैशाचे कलेक्शन वेगळे आहे.

**जुबेर इनामदार :-**

मान्य आहे. किती टक्के हार्डली २ टक्के सुध्दा फेरिवाले ज्या जागेवर फेरिवाले जे मार्केट केले आहे त्या ग्रिन कोट क्लबकडे बाहेर ही बसतात. आतमध्ये बसायला गेले बाहेरही बसतात. ते बंद झाले नाही.

आपली प्रभाग समिती इतकी सक्षम नाही की रोज त्यांच्यावरती कारवाई करतील. त्या शनिवारचा फायदा ते लोक उचलतात. आठवड्यामध्ये शनिवार येतात त्याचा फायदा उचलतात. कशाला ५ टक्के करता १० टक्के ठेवा.

**धृवकिशोर पाटील :-**

महत्वाचे जे रस्ते आहेत रस्त्यावरती अनधिकृत फेरिवाले दूर करण्याकरिता त्याचे एक टेंडर काढायचे आणि त्याच कॉन्ट्रॅक्टरने त्या फेरिवाला ती संकल्पना अशा ठिकाणी लावली तर ते कमी होतील. ज्यांना आपण मार्केटमध्ये स्थलांतर केलेले आहे आणि तेच पुन्हा बाहेर बसतात.

**मा. सभापती :-**

साहेब तिकडे एकदम स्ट्रिक्ट कारवाई करा. ज्याठिकाणी मार्केट बांधले आहेत तिकडे बाहेर फेरिवाले बसले नाही पाहिजेत.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय १० टक्के ठेवावे.

**धृवकिशोर पाटील :-**

जे महत्वाचे रस्ते आहेत त्या रस्त्यावरती अनधिकृत फेरिवाले दूर करण्याकरिता त्याचे एक टेंडर काढायचे. त्याच कॉन्ट्रॅक्टरने फेरिवाला ती संकल्पना अशाच ठिकाणी लावली तर ते कमी होतील. त्यांना आपण मार्केटमध्ये स्थलांतर केले आहे आणि तेच पुन्हा बाहेर बसतात ते चूकीचे आहे.

**मा. सभापती :-**

साहेब तिकडे स्ट्रिक्ट कारवाई करा. ज्या ठिकाणी मार्केट बांधलेले आहे तिकडे अजिबात फेरिवाले बाहेर बसू नयेत.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय १० टक्के ठेवावे. फेरिवाले हटवेल हा विषय शक्य नाही.

**मा. सभापती :-**

आपण प्रयत्न करु.

**जुबेर इनामदार :-**

सन्मा. सदस्य प्रभाग समितीचे सुध्दा लोक प्रभाग अधिकाऱ्यांना जोपर्यंत पोलिस बळ मिळत नाही. तोपर्यंत साधे फेरिवाले पण उचलायला जात नाही. तुम्ही त्या ठेकेदारांना असे बोला की ते काम तुम्ही करायचे कारण ते होणार नाही.

**राजीव मेहरा :-**

मा. सभापती साहेब मैंने इतनी बार कम्पलेन्ट किया कारवाई होती नही है। आज तक इतने फेरिवाले नही थे अभी शामको जाके देखो बोल बोल के थक गए। हर रोज तारीख मिलती है कल करेंगे, परसो करेंगे। हम लोग पुरा दिन ऑफिस में बैठते है पर कुछ कारवाई नही होती।

**जुबेर इनामदार :-**

महापौरांच्या अध्यक्षतेखाली मिटींग लागली होती ह्या विषयावर चर्चा झाली.

**धृवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब मागे आपली मिटींग झाली होती. त्या मिटींगमध्ये आयुक्तांनी खेत्रे साहेबांना एक नोट पूट अप करायला सांगितली होती की शहरातील महत्वाच्या रस्त्यावर फेरिवाले हटवण्याकरिता आपण एक ठेकेदाराला अपॉइन्ट केले. आपण प्रभाग अधिकाऱ्यांना बाऊन्सर देतो ते बसलेले असतात. कारवाई करत नाही. तो जो खर्च आहे ना तो न करता आपण प्रत्येक रोडव्हाईज एक संकल्पना राबवली होती की तिथे एक कॉन्ट्रॅक्टर अपॉइन्ट करावा आणि त्यांनी तिकडचे फेरिवाले साफ करावे आणि फेरिवाला दिसला तर त्याचे पैसे कट करावे. बारकुंड साहेब मागे आपली चर्चा झाली होती. त्यामध्ये बारकुंड साहेबांनी सांगितले तुम्ही नोट पूट अप करा आणि त्याच्यामध्ये असे सांगितले की त्याच्याकडन अंमड येऊ द्या. म्हणजे आपण असे सांगायचे नाही की दोन गाड्या पाहिजे की १० माणसे पाहिजे. फॉर एक्झाम्पल स्टेशन रोडला किंवा काशिमिरा रोडला किंवा मिरारोड स्टेशन आहे तो परिसर क्लिन करण्याकरिता तुम्हाला किती पैसे पाहिजेत. इथे एकही फेरिवाला बसला नाही पाहिजे. तुम्ही दोन गाड्या लावा किंवा एक गाडी लावा किंवा लावूच नका. तिकडे एकही फेरिवाला बसला नाही पाहिजे. अशा प्रकारे तुम्हाला नोट पूट अप करायला सांगितली होती. त्या गोष्टीला १० ते १५ दिवस झाले. महापौरकडे मिटींग झाली त्या मिटींगमध्ये सर्वांनी सांगितले की अनधिकृत फेरिवाल्यांवर कारवाई झाली पाहिजे. साहेब तुमच्याकडून अपेक्षा आहे की तुम्ही लोकांनी काम केले

पाहिजे. प्रत्येक वॉर्ड ऑफिसरला १०-१०, १५-१५ बाऊन्सर असतात त्यांचा काय फायदा काहीच फायदा नाही. त्या पैशांचा कुठेतरी युज झाला पाहिजे. तुम्ही कधीपर्यंत नोट पूट अप करणार.

**दादासाहेब खेत्रे :-**

२ दिवसात.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही ५ टक्के एकाकडे केलेले आहेत. किती समितीमध्ये केलेले आहेत.

**धृवकिशोर पाटील :-**

दोन ठिकाणी मार्केट झाल्यामुळे त्याला........

**जुबेर इनामदार :-**

ठीक आहे. अभय देण्यासारखा विषय होऊन जाईल. ह्या विषयाला आमचा विरोध आहे. प्रशासनाने प्रचलित पध्दतीने १० टक्के नैसर्गिक वाढ ही योग्य आहे. ६ महिन्यांची मुदत वाढ ती योग्य आहे. तेवढा वेळ लागेल नविन अभिकर्ता नियुक्त करायला. काही हरकत नाही. मात्र जो प्रमाण तुम्ही केलेले आहे दोन समितीकडे ५ टक्के.

**धृवकिशोर पाटील :-**

आपण १० टक्के ठेवले आहे.

**जुबेर इनामदार :-**

५ टक्के कुठे केले आहे त्याचा उल्लेखच नाही.

**धृवकिशोर पाटील :-**

मिरारोडला केले आहे.

**जुबेर इनामदार :-**

मिरारोडला सर्वांत जास्त फेरिवाले आहेत. तुमचे बाजार झाले कुठे जी.सी.सी. कडे झाले आहेत. ६ महिने मुदतवाढीला आमचा विरोध नसणार. तेवढा वेळ त्यांना लागेल. नैसर्गिक १० टक्के वाढ आहे ती कायम ठेवावी. एक बाजूला आम्ही विरोध करत आहोत. फक्त सदस्य करतो. आपल्याच महापौरांनी, आपल्या पक्षाच्या महापौरांनी खरतर शहराच्या त्या महापौर असतात. ह्या विषयावर विशेष बैठक लावून ३ तास चर्चा झाली, ९ ते ११ वाजेपर्यंत.

**मा. सभापती :-**

ते कस आहे फेरिवाले कॉन्ट्रॅक्टर आहेत त्यांनी सुध्दा आयुक्त आणि संबंधित विभागांना पत्र दिलेल आहे. ज्यावेळी त्यांचे फेरिवाले बसत होते ते शिफ्ट झाले होते.

**जुबेर इनामदार :-**

ते लोक निव्वळ खोट बोलतात. त्यांना पैसे कमी भरायचे आहेत. नैसर्गिक वाढ होणारच आहे.

**राजीव मेहरा :-**

हम लोग बोलते है निकालने के लिए तो बोलते है तुम खडे रहो।

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय तुम्हाला सांगू इच्छितो पूढे येणारी ठेका तुम्ही प्रक्रिया सुरु केली ना. तुम्हाला झालेली आज जी रक्कम येते. त्याच्यापेक्षा २० टक्के जास्त येणार आहे. कमी होणार नाही. त्यांनाही माहित आहे. पालिका किती सक्षम आहे रस्त्यावरचे फेरिवाले हटवायला.

**मा. सभापती :-**

आपण तीन महिन्यासाठीच मुदत दिली आहे.

**जुबेर इनामदार :-**

६ महिन्याची मुदतवाढ देतो.

**मा. सभापती :-**

तीन महिने ऑलरेडी झाले आहेत.

**जुबेर इनामदार :-**

कमी कशाला करायचे.

**मा. सभापती :-**

आपण ते नविनच करतो.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय मान्य आहे. पण तुम्ही त्याची टक्केवारी कमी कशाला करता. नैसर्गिक वाढ जी १० टक्के असायला पाहिजे. पालिकेचे नुकसान का? आपण अभय द्यायचा का?

**मा. सभापती :-**

आपण जे नविन मार्केट बांधले आहे. ते फेरिवाले तिथे शिफ्ट झाल्यावर त्याचे काय करणार?

**जुबेर इनामदार :-**

मार्केटमध्ये शिफ्ट होऊ द्या. तोपर्यंत तुमचे ६ महिने उलटतील. सभापती महोदय काही फरक पडणार नाही. तुम्ही उदया १५ टक्के केले तरी देतील. त्याची द्यायची तयारी आहे.

**मा. सभापती :-**

३ महिन्यांसाठी आपण बघू.

**जुबेर इनामदार :-**

५ टक्के अयोग्य आहे आणि मिरारोड क्षेत्रामध्ये फेरिवाले वाढत चालले आहेत. कमी होत नाही.

**मा. सभापती :-**

त्याच्यावर आपण कारवाई करु.

**जुबेर इनामदार :-**

काही कारवाई होत नाही. कारवाई विषयावर काही बोलण्यात अर्थ नाही.

**मा. सभापती :-**

तुम्ही सांगा फेरिवाल्यावर कशी कारवाई करणार.

**राजीव मेहरा :-**

मा. सभापती महोदय ३-३ महिने हो गए।

**जुबेर इनामदार :-**

कारवाई हा विषयच बेकार आहे. रस्त्यावर चालायला जागा नाही. कारवाई होत नाही. पालिकेचे आर्थिक नुकसान करु नये. स्थायी समिती वैधानिक समिती अर्थव्यवस्थेची समिती आहे. कशाला नुकसान करुन घ्यायचे. ठेकेदाराला कशाला मदत करायची ते मला समजत नाही. त्याच्यात पालिकेचे काय इंटरेस्ट असणार. सदस्याचा काय इंटरेस्ट आहे का? प्रत्येक सदस्य विरोध करतो. मग कशाला त्यांना अभय दिला आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

अभय देण्याचा प्रश्न नाही.

**जुबेर इनामदार :-**

अभय देण्यासारखेच झाले मग पैसे कशाला कमी करता.

**धृवकिशोर पाटील :-**

पैसे कमी केले नाही उलटे ५ टक्के वाढवले आहे.

**जुबेर इनामदार :-**

ते तुम्हाला निविदा प्रक्रिया झाली असती तर १५-२० टक्के वाढ झाली असती.

**धृवकिशोर पाटील :-**

टेम्परारी ठेवली आहे. काही फेरिवाल्यांना आपण त्या मार्केटमध्ये स्थलांतर फेरिवाल्यांची संख्या कमी झाली. मार्केटचे पैसे महापालिकेत जमा पण होते.

**जुबेर इनामदार :-**

मिरारोडमध्ये मार्केट कुठे आहे ते सांगा. मंगल नगरमध्ये बसणारे परत बाहेर बसतातच.

**धृवकिशोर पाटील :-**

कम से कम ३००-४०० फेरिवाले अंदर बैठे है।

**जुबेर इनामदार :-**

३००-४०० फेरिवाले आतमध्ये बसले तर ३००-४०० परत बाहेर वाढले आहेत आणि अतिरिक्त आयुक्त साहेब माझी तुम्हाला ह्या विषयावर सुचना आहे. पुढच्या वेळी निविदा प्रक्रिया करताना. अटीशर्ती जेव्हा ठेवाल त्या अटीशर्तीमध्ये अनुभवाची अट फेरिवाला, बाजार फी वसूलीसाठी अनुभव कशाला लागतो. फेरिवाल्याजवळ पैसे जमा करायला अनुभव लागतो. म्हणून आपल्याकडे स्पर्धा होत नाही. तेच लोक परत येतात. स्पर्धा पाहिजे असेल तर अटीशर्ती शिथील करायला लागतील आणि त्या शिथिल करा. आमचे त्याच्यावर विशेष लक्ष

असणार ती शिथिल झाली पाहिजे. ह्याचा अर्थ असा होतो प्रशासन सुध्दा त्याच फेरिवाल्यांना मदत करत आहे. मिरारोड स्टेशनवर २८ लाख रुपये पार्किंग होती. त्याची अटीशर्ती शिथिल करण्यात आली. अनुभवाची अट काढण्यात आली. कारण पार्किंगला कुठला अनुभव लागत नाही. श्री. सुरेश काकाणी तत्कालीन आयुक्त होते ती अट काढल्यानंतर तो ठेका आज ७०-७५ लाखावर जातो.

**धृवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब आपण ५ टक्के ऑर्डर आहे ना ती टोटल अमाऊंटवर ५ टक्के ऑर्डर आहे. एक्झाम्पल १० लाख त्या मार्केटमधून पैसे येत होते. त्याच्यावरती ५ टक्के ऑर्डर आहे. पण ३००-४०० लोक त्या मार्केटमध्ये टाकले. त्याचे पैसे त्याला कमी झालेच ते पैसे कमी होऊन तो लॉस त्याला आहे. आपण त्या १० लाखावरती आपण ५ टक्के वाढवले. त्याला डबल लॉस आहे.

**जुबेर इनामदार :-**

धृवकिशोरजी ह्या महापालिकेला तुमच्या अर्थव्यवस्थेमध्ये थोडी भर पडली तर तुम्हाला त्याची काही अडचण आहे का?

**धृवकिशोर पाटील :-**

अडचण नाही. तुम्हाला माहित नाही. मी तुम्हाला सांगतो.

**जुबेर इनामदार :-**

आमच्या लक्षात आले महापालिकेला त्याची वसूली करत असेल किंवा महापालिका त्याचे देयक घेत असेल.

**धृवकिशोर पाटील :-**

एक्झाम्पल घ्या १००० फेरिवाल्यामधून ३००-४०० फेरिवाले स्थलांतर केले आहेत. तरी तो ३००-४०० फेरिवाल्यांचे पैसे घेत नाही. त्या मेन अमाऊन्टवर ५ टक्के वाढ केली म्हणजे फायनान्शीयल तो लॉसमध्ये आहे आणि आपण प्रॉफिटमध्ये आहोत.

**जुबेर इनामदार :-**

ह्या महापालिकेचा इतिहास आहे जितके बाजार आपण तयार करुन दिले आणि ज्यांना आपण आतमध्ये बसवले त्यांनी महापालिकेचे देयक अदा केले नाही त्यांना आपण नेहमी सुटच देत आलो. गेल्या महासभेमध्ये आपण तसे केले आहे. ३०० रुपये वरुन आपण ३० रुपये वर आलो.

**धृवकिशोर पाटील :-**

तो विषय वेगळा आहे.

**जुबेर इनामदार :-**

कसा वेगळा आहे. तो महापालिकेचा विषय आहे. का तुम्ही ५ टक्के करता.

**धृवकिशोर पाटील :-**

आम्ही तुम्हाला एक्सप्लेन करतो. तुमचे जे सजेशन होते त्याच्यावर हे एक्सप्लेनेशन आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठेकेदाराच्या बाजूचे एक्सप्लेनेशन तुम्ही कशाला करतो. प्रशासनानी करावे. तुम्ही ठेकेदाराची बाजू घेऊन एक्सप्लेनेशन देतात. असू दे तुम्हाला काय फरक पडतो १० टक्के असेल तर भरतील ना ते साहेब तुम्ही निविदा प्रक्रिया केली तर २० टक्के जास्त येणार आहे. अनुभवाच्या अटीशर्ती काढून टाका. तुम्हाला २५ टक्के जास्त भेटेल. लोक द्यायला तयार आहेत. परंतु त्याच लोकांना घरचा जावई करुन घेतले आहे. आमची स्पष्ट सुचना आहे १० टक्के ठेवा. ६ महिन्याच्या मुदतवाढीला माझा अजिबात विरोध नाही. आमची भुमिका ठाम आहे. तुमची मर्जी तसे करत असाल एकच ठराव जाईल नाही तर आम्ही आमचा ठराव करतो. आम्ही प्रशासनाकडे दाद मागू आणि प्रशासनाकडे जाऊ. महापौर ३ तास फेरिवाला हटाओ मोर्चा चालू होता. दुसऱ्या बाजूला ठेकेदारांना मदत करण्यासाठी सदस्यांना ५ टक्के हा आमचा आरोप आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

तुमचा आरोप चुकीचा आहे.

**जुबेर इनामदार :-**

आम्हाला आरोप करायला तुम्ही मुभा का देता?

**धृवकिशोर पाटील :-**

१० टक्के पेक्षा जास्त पैसे आपल्याला मिळतात.

**जुबेर इनामदार :-**

आरोप करायला मुभा कशाला देता १० चे १५ केले असते ना तर आम्हाला तुमच्यावर गर्व झाला असता.

**मा. सभापती :-**

३ महिन्यानंतर आपण करु.

**जुबेर इनामदार :-**

मग आम्ही ठराव करु.

**धृवकिशोर पाटील :-**

आम्ही पैसे वाढवले आहेत.

**जुबेर इनामदार :-**

आम्ही प्रशासनाने दिलेला गोषवारा मा. आयुक्त साहेब ह्यांच्या मान्यतेने दिलेला गोषवारा त्याला मान्यता देत आहोत. भाईंदर पूर्व, भाईंदर पश्चिम व मिरारोड ते चेणा या परिसरातील फेरीवाल्यांकडुन बाजार फी वसूलीकामी सन २०१८-१९ करीता ई-ऑक्शन पद्धतीने लिलाव प्रक्रीया करणेकरीता दि. २२/८/१८ रोजी जाहिर नोटीस प्रसिद्धी करण्यांत आली आहे. दरम्यानचे कालावधीत मा. महापौर साो. यांनी सदर्भिय पत्रान्वये सदर ई-ऑक्शन पुढील २/३ महिन्याकरीता स्थगीत करणेस सुचविले आहे. सदर पत्रामध्ये शहरामध्ये दि. १५/०८/२०१८ रोजी २ मार्केट बीओटी तत्वावर सुरु करण्यांत आलेले असून येत्या २-३ महिन्यात आणखी ५ मार्केट बीओटी तत्वावर सुरु करण्यंत येणार आहेत. व त्या परिसरातील मोठया संख्येने फेरीवाले सदर मार्केट मध्ये स्थलांतरीत करण्यांची योजना आहे. अशाप्रकारे सार्व. रस्त्यंवरील फेरीवाल्यांकरीता बीओटी तत्वावर मार्केट सुरु करण्याचे कार्यवाही सुरु आहे. त्यामुळें सार्व. रत्यांवरील फेरीवाल्याची संख्या मोठया प्रमाणावर कमी होणार असल्याने पुढील २-३ महिने बाजार फी वसूली ठेक्याबाबत लिलाव प्रक्रीया स्थगीत ठेवावी व सध्या कार्यरत ठेकेदार यांचेकडुन बाजार फी वसूली सुरु ठेवावी तद्नंतर पुढील निर्णय घेणेबाबत मा. महापौर साो. यांनी दि. ३१/०८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले होते. त्या अनुषंगाने प्रसिद्ध करण्यांत आलेले बाजार फी लिलाव (ई-ऑक्शन) प्रक्रीया स्थगीत करण्यांत आलेली आहे. जरी नविन अभिकर्ता नियुक्त करण्याची प्रक्रीया स्थगीत केली असली तरी महानगरपालिका हद्दीत व्यवसाय करणारे फेरीवाले यांचेकडुन बाजार फी वसूल करुन महानगरपालिका फंडात जमा करणे अत्यावश्यक आहे. तसेच पुढील नविन अभिकर्ता नियुक्त करावयाच्या कालावधीपर्यंत महानगरपालिकेच्या कर्मचारी यांचेकडुन बाजार फी वसूली करावयाचे झाल्यास संपूर्ण परिसरातील फेरीवाले यांचेकडुन बाजार फी वसूली करुन महानगरपालिका फंडात जमा करुन घेणेकरीता सदरकामी किमान ४० अधिकारी/ कर्मचारी यांना पुर्णवेळाकरीता नियुक्त करावे लागेल. त्यामुळे कार्यालयीन कामकाजावर त्याचा परिणाम होईल. तरी सद्यसिस्थीत कार्यरत ठेकेदारास पुढील २ ते ३ महिने (दि. ०९/१०/१८ पासून) च्या कालावधीकरीता मंजूर देकार रक्कमेमध्ये १०% प्रशासकिय वाढ करुन मुदतवाढ देणेस मा. स्थायी समितीची प्रशासकिय मंजूरी देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**दिप्ती भट :-**

माझे अनुमोदन आहे. मा. सभापतींच्या परवानगीने बोलते. मिरारोड स्टेशनला ज्याप्रमाणे स्टेशन रिनोव्हेट केले आहे त्या साईडला फेरिवाले आहेतच पण जिथे पोस्ट ऑफिस न्यू बनवणार आहेत इथून ते पालघरपर्यंत एकच पोस्ट ऑफिस आहे. मिरारोड रिक्षा स्टॅन्ड आहे तिथे तिकडे एवढे फेरिवाले आहेत की रात्री अपघात झाला तर ॲम्ब्युलन्स नेऊ शकत नाही आणि त्यांनी सेक्टर १ आणि २ मध्ये कारवाई केली आणि कोर्टमधून स्टे आणला आणि २०१२-१४ चा नियम दाखवला त्यांना तुम्ही डिक्लेरेशन करा की हे एक फुटपेक्षा जास्त तेवढे तर बोलू शकता. मिरारोड स्टेशनला निघणार तर चार फुट जागा सोडतात. चार फुटनंतर ते लावतात आणि खाली चालणार तर एक दुसऱ्याला हात लागतो. तिकडून ॲक्टिव्हा पण जात नाही. तर बाईक कशी जाणार. तर ॲब्युलन्स कशी जाणार. संध्याकाळी ६ ते ७ च्या दरम्यान तिकडून गाडी घेऊन निघून बघा. मिरारोडमध्ये जे तुम्ही मार्केट बोलता ते मिरारोडमध्ये एक पण मार्केट नाही. मिरारोड पार्किंग एरियामध्ये तीन फ्लोरचे २०१०-११ मध्ये विचार केलेला की मार्केट बनवून पार्किंग बनवुन कोणाला तरी कॉन्ट्रॅक्ट बेसवर देऊन असे आपण शिवार गार्डनच्या सामोर गार्डन बनवले तसे बनवायचे विचार होता. पण ते पण नाही करत. कारण कुठे मार्केट बनवायची जागाच नाही. ती एकच जागा आहे जिकडे पार्किंग पण करु शकतो आणि मार्केट बनवू शकतो. ते नगररचनाकडून का अडकले आहे मला माहित नाही. मी वारंवार २०११ पासून रेग्यूलर लेटर देते. ते कशासाठी अडकले आहे ते समजत नाही. ते पण सभापती साहेब बघा कारण मिरारोडला मार्केट होणे पॉसिबल नाही. जागाच नाही तर कुठे बनवणार आहेत. फिश मार्केटच्या बाजूला एक

मार्केट आहे. तिकडे कोणी बसत नाही. ह्यांना उठवून त्यांना आतमध्ये घाला. काहीतरी करा. त्याच्यामध्ये पण लोकांनी पैसे घेऊन सामान ठेवायला दिले आहे. त्याचा यूज तसा होतो. गैरयूज होतो.

**मा. सभापती :-**

साहेब मॅडमनी जी सुचना मांडली त्याच्यावर कारवाई करा.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १६५ करिता दोन ठराव आले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. धृवकिशोर पाटील, अनुमोदन श्री. राकेश शहा. दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार, अनुमोदन श्रीम. दिप्ती भट. प्रथम दुसरा ठराव मतदानास पुकारतो. श्री. जुबेर इनामदार ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. धृवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. सभापती :-**

सुचक श्री. धृवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ९, विरोधात ४ तटस्थ ०० इतकी मत पडली आहेत. सुचक श्री. धृवकिशोर पाटील ह्यांचा ठराव बहुमतांनी मंजूर करण्यांत येत आहे.

**वर्षा भानुशाली :-**

हम लोग जो फेरिवाले को बिठाते है। उनसे एक मिटर का फिज लेते है। मैंने मेरे वॉर्ड में बारबार तक्रार किया है। सुभाषचंद्र बोस गार्डन में जो रोड है वहाँ पे मालाड बोरीवली से बसेस आके खडी रहती है। १-२ बार गलत काम हुआ। पोलिस स्टेशन मुझे जाना पडा वैसे ही प्लानेट एरिया जो नया हो रहा है। वहाँ पे भी बसेस पार्क हो रही है। हम लोग क्या कर रहे है नमक की रखवाली कर रहे है और शक्कर की गोणीया जा रही है। वो रोड से कोई वसूली नही कर रहे और वो लोग हमारे मिरा भाईंदर के स्थानिक वासी उनको प्लेस दे रहे है। तो मेरी विनंती है की आप उसके उपर जल्दी से जल्दी कारवाई किजीए। सामने जो झोपडपट्टी है वहाँ बहुत गलत काम हो रहे है। स्थानिक नगरसेवक होने की वजह से मुझे पुलिस स्टेशन नही बैठना पडा।

**मा. सभापती :-**

साहेब भानुशाली मॅडमनी जी कम्पलेन्ट केली आहे त्यावर लेखी तक्रार करा.

**वर्षा भानुशाली :-**

प्लानेट एरिया आहे. कमीत कमी १०० बस उभ्या असतात.

**राजीव मेहरा :-**

नगरपालिका प्रायव्हेट बस रोड पे रातभर पार्क रहती है। उसका कुछ टॅक्स लेती है क्या? परमीशन देती है। बॉम्बे में पार्किंग का चार्ज लिया जाता है।

**मा. सभापती :-**

कारवाई करनी चाहिए।

**राजीव मेहरा :-**

कही पे भी कारवाई नही होती है। यह बसेस रातभर खडी रहती है। उसके पिछे ड्रग्ज और काफी कुछ होता है। एस.के.स्टोन, शितल नगर और लोकल्स को जादा प्रॉब्लेम है।

**प्रकरण क्र. १६५ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर पूर्व, भाईंदर पश्चिम, मिरारोड ते चेणा या विभागाच्या बाजार फी वसुली अभिकर्ता नियुक्ती बाबत.**

**ठराव क्र. १४० :-**

भाईंदर पूर्व, भाईंदर पश्चिम व मिरारोड ते चेणा या परिसरातील फेरीवाल्यांकडुन बाजार फी वसूलीकामी सन २०१८-१९ करिता ई-ऑक्शन पध्दतीने लिलाव प्रक्रिया करणेकरिता दि. २२/०८/२०१८ रोजी जाहिर नोटीस प्रसिध्द करण्यात आली आहे. दरम्यानचे कालावधीत मा. महापौर सो. यांनी संदर्भिय पत्रान्वये सदर ई-ऑक्शन पुढील २/३ महिन्याकरिता स्थगीत करणेस सुचविले आहे. सदर पत्रामध्ये शहरामध्ये दि. १५/०८/२०१८ रोजी २ मार्केट बीओटी तत्वावर सुरु करण्यात आलेले असून येत्या २-३ महिन्यात आणखी ५

मार्केट बीओटी तत्वावर सुरु करण्यात येणार आहेत. व त्या परिसरातील मोठया संख्येने फेरीवाले सदर मार्केट मध्ये स्थलांतरित करण्याची योजना आहे.

अशाप्रकारे सार्व. रस्त्यांवरील फेरीवाल्यांकरिता बीओटी तत्वावर मार्केट सुरु करण्याचे कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे सार्व. रस्त्यांवरील फेरीवाल्याची संख्या मोठया प्रमाणावर कमी होणार असल्याने पुढील २-३ महिने बाजार फी वसूली ठेक्याबाबत लिलाव प्रक्रिया स्थगीत ठेवावी व सध्या कार्यरत ठेकेदार यांचेकडुन बाजार फी वसूली सुरु ठेवावी तद्नंतर पुढील निर्णय घेणेबाबत मा. महापौर साो. यांनी दि. ३१/०८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले होते.

त्या अनुषंगाने प्रसिध्द करण्यात आलेले बाजार फी लिलाव (ई-ऑक्शन) प्रक्रिया स्थगीत करण्यात आलेली आहे. जरी नविन अभिकर्ता नियुक्त करण्याची प्रक्रिया स्थगीत केली असली तरी महानगरपालिका हद्दीत व्यवसाय करणारे फेरीवाले यांचेकडून बाजार फी वसूल करून महानगरपालिका फंडात जमा करणे अत्यावश्यक आहे.

तसेच पुढील नविन अभिकर्ता नियुक्त करावयाच्या कालावधीपर्यंत महानगरपालिकेच्या कर्मचारी यांचेकडून बाजार फी वसूली करावयाचे झाल्यास संपूर्ण परिसरातील फेरीवाले यांचेकडून बाजार फी वसूली करून महानगरपालिका फंडात जमा करून घेणेकरिता सदरकामी किमान ४० अधिकारी / कर्मचारी यांना पुर्णवेळाकरिता नियुक्त करावे लागेल. त्यामुळे कार्यालयीन कामकाजावर त्याचा परिणाम होईल.

भाईंदर (पुर्व) येथे नविन मार्केट व शेड बांधलेले असल्याने त्या ठिकाणी फेरीवाले मार्केट मध्येच व्यवसाय करीत असल्याने रकमेमध्ये ०% प्रशासकीय वाढ करावी. मिरोराड (पूर्व) येथे मार्केट उपलब्ध असुन परंतु त्या ठिकाणी फेरीवाल्यांच्या संख्या प्रमाणे रकमेमध्ये ५% प्रशासकीय वाढ करण्यात यावी व भाईंदर (प.) येथे मार्केट उपलब्ध नसल्याने रकमेमध्ये १०% प्रशासकीय वाढ करणेस ही सभा मंजूरी देत आहे. सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या ठेकेदारास पुढील ६ महिने (दि. ०९/१०/२०१८ ते दि.०५/०४/२०१९ पर्यंत) च्या कालावधीकरिता ठरावाप्रमाणे ठेकेदारास मुदतवाढीचे कार्यादेश देऊन बाजार वसूली कार्यवाही सुरु ठेवावी, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. राकेश शाह**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. व्यास रवि वासुदेव | १ | श्रीम. दिप्ती भट्ट | निरंक |
| २ | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | २ | श्रीम. तारा विनायक घरत | |
| ३ | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | ३ | श्री. राजीव मेहरा | |
| ४ | श्रीम. यादव मीरादेवी रामलाल | ४ | श्री. जुबेर इनामदार निरंक | |
| ५ | श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंह | | | |
| ६ | श्रीम. वंदना मंगेश पाटील | | | |
| ७ | श्रीम. निला बर्नाड सोंस | | | |
| ८ | श्रीम. वर्षा भानुशाली | | | |
| ९ | श्री. राकेश शाह | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

सही/-

**सभापती**

**स्थायी समिती**

मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १६६, **पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देणे. (आस्थापना विभाग) (मा. स्थायी समिती सभा दि. १४/१२/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. १४०)**

**धृवकिशोर पाटील :-**

महानगरपालिका आस्थापनेवरील शासन मंजूर पदानुसार तसेच अस्थायी कर्मचा-यांचे सन २०१७-१८ अंदाजपत्रकानुसार तरतुदी करण्यात आल्या होत्या.

महानगरपालिका आस्थापनेवरील शासन मंजूर पदानुसार तसेच अस्थायी कर्मचा-यांचे सन २०१७-१८ अंदाजपत्रकानुसार केलेल्या तरतुदीप्रमाणे सार्वजनिक आरोग्य विभाग (स्मशान भुमी), वाचनालय विभाग, आरोग्य विभाग (घनकचरा/डंपिंग), उद्यान विभाग, अतिक्रमण विभाग (सुरक्षा/पोलीस), मिळकत विभाग, शिक्षण विभाग, पाणी पुरवठा विभाग, बांधकाम विभाग (सुरक्षा/ट्राफिक वॉर्डन) य विभागांसाठी अस्थायी आस्थापना व सुरक्षा व्यवस्था या लेखाशिर्षाखाली आस्थापना विभागामार्फ़त तरतूद वापरण्यात येत आहे. तसेच सार्वत्रिक निवडणूक अतिकालीन भत्ता या विभागासाठी करण्यात आलेली तरतुद अपूरी पडत असल्यामुळे पूर्नविनियोजन करुन तरतूद वाढविणे आवश्यक आहे.

महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी सार्वजनिक आरोग्य विभाग व स्थायी वैद्यकीय आरोग्य विभाग या विभागाकरीता स्थायी आस्थापना या लेखाशिर्षाखाली एकुण तरतुद तसेच झालेला खर्च पाहता, उपलब्ध होणारी तरतुद रु.११०६.६८ लाख उपलब्ध होत आहे.

परंतु सार्वजनिक आरोग्य विभाग (स्मशान भुमी), वाचनालय विभाग, आरोग्य विभाग (घनकचरा/डंपिंग), उद्यान विभाग, अतिक्रमण विभाग (सुरक्षा/पोलीस), मिळकत विभाग, शिक्षण विभाग, पाणी पुरवठा विभाग, बांधकाम विभाग (सुरक्षा/ट्राफिक वॉर्डन) तसेच सार्वत्रिक निवडणूक अतिकालीन भत्ता या विभागातील अस्थायी आस्थापना सोबतच्या तक्त्यातील परिशिष्ठ (ब) मध्ये प्रस्तावित वाढीचा खर्च रु.११०६.६८ लाख होणार आहे. तरी परिशिष्ट (अ) स्थायी आस्थापना या लेखाशिर्षकामधील उपलब्ध होणारी तरतूद मधून परिशिष्ट (ब) अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षकामधील प्रस्तावित वाढीची रक्कम एकूण रु. ११०६.६८ लाख पुर्नविनियोजनचा प्रस्तावास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**राकेश शहा :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. १६६ :-**

**पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देणे. (आस्थापना विभाग) (मा. स्थायी समिती सभा दि. १४/१२/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. १४०)**

**ठराव क्र. १४१ :-**

महानगरपालिका आस्थापनेवरील शासन मंजूर पदानुसार तसेच अस्थायी कर्मचा-यांचे सन २०१७-१८ अंदाजपत्रकानुसार तरतुदी करण्यात आल्या होत्या.

महानगरपालिका आस्थापनेवरील शासन मंजूर पदानुसार तसेच अस्थायी कर्मचा-यांचे सन २०१७-१८ अंदाजपत्रकानुसार केलेल्या तरतुदीप्रमाणे सार्वजनिक आरोग्य विभाग (स्मशान भुमी), वाचनालय विभाग, आरोग्य विभाग (घनकचरा/डंपिंग), उद्यान विभाग, अतिक्रमण विभाग (सुरक्षा/पोलीस), मिळकत विभाग, शिक्षण विभाग, पाणी पुरवठा विभाग, बांधकाम विभाग (सुरक्षा/ट्राफिक वॉर्डन) य विभागांसाठी अस्थायी आस्थापना व सुरक्षा व्यवस्था या लेखाशिर्षाखाली आस्थापना विभागामार्फ़त तरतूद वापरण्यात येत आहे. तसेच सार्वत्रिक निवडणूक अतिकालीन भत्ता या विभागासाठी करण्यात आलेली तरतुद अपूरी पडत असल्यामुळे पूर्नविनियोजन करुन तरतूद वाढविणे आवश्यक आहे.

महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी सार्वजनिक आरोग्य विभाग व स्थायी वैद्यकीय आरोग्य विभाग या विभागाकरीता स्थायी आस्थापना या लेखाशिर्षाखाली एकुण तरतुद तसेच झालेला खर्च पाहता, उपलब्ध होणारी तरतुद रु.११०६.६८ लाख उपलब्ध होत आहे.

परंतु सार्वजनिक आरोग्य विभाग (स्मशान भुमी), वाचनालय विभाग, आरोग्य विभाग (घनकचरा/डंपिंग), उद्यान विभाग, अतिक्रमण विभाग (सुरक्षा/पोलीस), मिळकत विभाग, शिक्षण विभाग, पाणी पुरवठा विभाग, बांधकाम विभाग (सुरक्षा/ट्राफिक वॉर्डन) तसेच सार्वत्रिक निवडणूक अतिकालीन भत्ता या विभागातील अस्थायी आस्थापना सोबतच्या तक्त्यातील परिशिष्ट (ब) मध्ये प्रस्तावित वाढीचा खर्च रु.११०६.६८ लाख होणार आहे. तरी परिशिष्ट (अ) स्थायी आस्थापना या लेखाशिर्षकामधील उपलब्ध होणारी तरतूद मधून परिशिष्ट (ब) अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षकामधील प्रस्तावित वाढीची रक्कम एकूण रु. ११०६.६८ लाख पुर्नविनियोजनचा प्रस्तावास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. धृवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. राकेश शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

## आस्थापना विभाग

## नमुना क्र.१० नियम (३० (३)) पूर्नविनियोजन तक्ता

**आकडेवारी (लाखात)**

| (अ) आस्थापना विभागाचे खालील लेखाशिर्षकातुन शिल्लक तरतुद वर्ग करणेकरिता | | | | | | | | (ब) आस्थापना विभागाचे खालील लेखा शिर्षकामध्ये तरतुद पुर्नविनियोजनासाठी वर्ग | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | लेखाशिर्ष | मुळ तरतुद २०१८-१९ | झालेला खर्च (नोव्हेंबर २०१८) | शिल्लक निधी ( ३-४) | माहे मार्च २०१९ पर्यंत होणारा अपेक्षित खर्च | उपलब्ध होणारी तरतुद (५-६) | अ. क्र. | लेखाशिर्ष | मुळ तरतुद २०१८-१९ | झालेला खर्च | शिल्लक तरतूद (१०-११) | माहे मार्च २०१९ पर्यंत होणारा अपेक्षित खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम (१३-१२) | शेरा |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| स्थायी आस्थापना | | | | | | | | अस्थायी आस्थापना | | | | | | लेखाशिर्ष स्थायी सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय |
| १. | स्थायी आस्थापना सार्वजनिक | ३५००.०० | १८३८.९१ | १६६१.०९ | ५९४.८६ | १०६६.२३ | १. | सार्व.आरोग्य विभाग (स्मशान भुमी) सुरक्षारक्षक | ७५ | ६८.७२ | ६.२८ | ८७.९६ | ८१.६८ | |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आरोग्य | | | | | | | | | | | | आरोग्य विभागामधील एकुण शिल्लक तरतुद १७७१.३४ लाख असुन, सदर मुळ तरतुदीतुन स्थायी सार्वजनिक आरोग्य विभाग व स्थायी वैद्यकीय आरोग्य विभागामधील लेखाशिर्षासाठी या वर्ष अखेर पर्यत होणारा खर्च वजा जाता उपलब्ध होणारा खर्च (*) रु.११०६.६८ लाख यामधुन रु.११०६.६८ लाख इतकी तरतुद पुर्रविनियोजनासाठी वर्ग करणेस शिफारस आहे. |
| २. | स्थायी आस्थापना वैद्यकीय आरोग्य विभाग | १५५६.५२ | ६४४.५७ | ९११.९५ | २०६.३४ | ७०५.६१ | २. | वाचनालय विभाग सुरक्षारक्षक | १५ | १२.३५ | २.६५ | ३९.९६ | ३७.३१ |
| | | | | | | | ३. | आरोग्य विभाग (घनकचरा/डंपिंग) सुरक्षारक्षक | २६.५० | १९.४० | ७.१ | २१.१९ | १४.०९ |
| | | | | | | | ४. | उद्यान विभाग सुरक्षारक्षक | ३५० | ३४१.४३ | ८.५७ | ३६६.२४ | ३५७.६७ |
| | | | | | | | ५. | अतिक्रमण विभाग (सुरक्षा/पोलीस) | २५० | १९३.१९ | ५६.८१ | १३९.५६ | ८२.७५ |
| | | | | | | | ६. | मिळकत विभाग सुरक्षारक्षक | ६० | ५६.३५ | ३.६५ | ७६.९३ | ७३.२८ |
| | | | | | | | ७. | शिक्षण विभाग सुरक्षारक्षक | १४१.४५ | १११.६० | २९.८५ | १२१.८९ | ९२.०४ |
| | | | | | | | ८. | पाणी पुरवठा विभाग सुरक्षारक्षक | १७७.६३ | १३०.१६ | ४७.४७ | १४३.०९ | ९५.६२ |
| | | | | | | | ९. | बांधकाम विभाग (सुरक्षा/ट्राफीक वॉर्डन) | ३०० | २८५.५१ | १४.४९ | २२२.७३ | २०८.२४ |
| | | | | | | | १०. | सार्वत्रिक निवडणूक अतिकालीन भत्ता | २५ | ०९ | १६ | ८० | ६४ |
| **एकुण** | | **५०५६.५२** | **२४८३.४८** | **२५७३.०४** | **८०१.२** | **१७७१.३४** | **एकुण** | | **१४२०.५८** | **१२२७.७१** | **१९२.८७** | **१२९९.५५** | **११०६.६८** | |

उपलब्ध होणारी तरतुद रु.११०६.६८ लाख असून प्रस्तावित वाढीचा खर्च रु.११०६.६८ लाख होणार आहे. तरी परिशिष्ट (अ) स्थायी आस्थापना या लेखाशिर्षकामधिल उपलब्ध होणारी तरतूद मधून परिशिष्ट (ब) अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षकामधील प्रस्तावित वाढीची रक्कम एकूण रु. ११०६.६८ लाख पुनर्विनियोजन प्रस्तावास मा.स्थायी समिती ची मंजुरी मिळणेस विनंती आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १६७, **पुर्नविनियोजनाद्वारे तरतुद उपलब्ध करुन देणेबाबत (पशु संवर्धन विभाग)**

**हसमुख गेहलोत :-**

लेखाशिर्ष रुग्णालये व दवाखाने सांकेताक क्र. २२९० : कपडे धुलाई/साफसफाई इतर कामी रु. २ कोटी तरतूद करण्यात आली आहे. सदर तरतुदीमधून आज तारखेपर्यंत रु. ६१,२१,०००/- इतका खर्च झालेला असून रु. १,३८,७९,०००/- रक्कम शिल्लक आहे. रु. १,३८,७९,०००/- मधील रु. २० लक्ष मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त या लेखाशिर्षात पुननियोजन केल्यास सदर कामाचा सर्व खर्च भागविणे शक्य होणार आहे.

सबब, मा. नगरसेवक / नगरसेविका, पदधिकारी, नागरीक यांचे मोकाट कुत्र्यांबद्दलच्या तक्रारींचे प्रमाण लक्षात घेता उर्वरित कालावधीसाठी पुर्ननियोजन करणे आवश्यक वाटते तरी रुग्णालयीन कपडे धुलाई / साफसफाई / इतर कामे या लेखाशिर्षातून "मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त, निर्बिजीकरण व लसीकरण करणे" कामी या लेखाशिर्षाखाली रु. २०.०० लाख मात्र पुर्ननियोजन करणेस शिफारस असे.

तरी "मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त, निर्बिजीकरण व लसीकरण करणे" कामी या लेखाशिर्षाखाली रु. २०.०० लाख पुर्ननियोजनाद्वारे तरतुदीस सोबत जोडलेल्या प्रपत्रास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

**राकेश शहा :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

पानपट्टे साहेब ह्या विषयाच्यावर उच्च न्यायालयाचे काही ऑर्डर आल्या आहेत का? श्वान कोणाला चावले तर त्याला पालिकेनी मोबदला द्यायचा आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापतींच्या परवानगीने असे काही नाही.

**जुबेर इनामदार :-**

साहेब माहिती द्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

माहिती घेतो.

**जुबेर इनामदार :-**

पत्रकारांनी माहिती दिली म्हणून मी त्यांच्याकडून ऑर्डर मागितली आहे. तुम्ही माहिती घ्या.

**दिप्ती भट :-**

मिरारोड संस्थेला देणार होते ते महासभेमध्ये पास झाले होते. त्यांना कुठे जागा दिली आहे का? आणि ब्रेन ट्यूमर झालेल्या कुत्र्यांना कुठे पाठवतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

एस.पी.सी.ए. म्हणून मुंबईला आहे तिकडे पाठवतो.

**दिप्ती भट :-**

आम्हाला जर कॉल आला ज्यांनी ठेका घेतला आहे आणि ते बघतात. त्यांना आम्ही सांगितल्यावर त्यांनी पाठवायला पाहिजे. त्या माणसांना नंबर देणार परत फॉलोअप करा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

खाजगी संस्था वेगळी आहे. आपल्या ह्याच्यात येत नाही ना. आपण त्यांना विनंती करतो. आपल्या स्वतःचे हॉस्पीटल व्हायला पाहिजे म्हणजे आपण सर्व ट्रीटमेंट करु शकतो.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय ह्या विषयाचा मुद्दामहून उल्लेख करतो. म्हणजे तो रेकॉर्डवर येईल. आमच्या इथे वॉचमनच्या पत्नीला परिसरातल्या कुत्र्याने चावले. तिला असे चावले की तिचा पायाचा आट्रीया आहे तो रप्चर झाला. प्राथमिक उपचारासाठी लोकल डॉक्टरकडे घेऊन गेले. त्याला त्यांनी बँडेज केले. पुनम सागर इंदिरा गांधी हॉस्पीटलमध्ये घेऊन गेले. त्यांनी बँडेज उघडून बघितले तेव्हा त्यांना वाटले की इथे करता येणार नाही. म्हणून टेंभामध्ये शिफ्ट केले मी तिच्या बरोबरच होतो. टेंभामध्ये डॉक्टर बँडेज उघडून बघितले तिचा आट्रीया अशाप्रकारे रप्चर झाली होती की रक्ताचे प्रमाण पाण्याचे होते. त्याप्रमाणे होत होते. ती गरीब बाई तिला मोठे रुग्णालय पाहिजे. जिथे कार्डीओ एक्सपर्ट सर्जन असायला पाहिजे. जे आट्रीस्टिच करतात. तिला के.ई.एम. किंवा नायरमध्ये घेऊन जायचे. प्रेशर वाईडेज असल्यामुळे कदाचित ती मुंबईत पोहचेपर्यंत तिचा पाय गँगरीन

झाला असता. तो पाय कापावा लागला असता. माजी आमदार मुझफ्फर हुसैन साहेबांना मी विनंती केली त्यांनी तिला व्होकार्डला बोलवून घेतले. व्होकार्डमध्ये तिची ट्रीटमेंट झाली. तीन दिवस ती ॲडमिट होती. १ लाखाच्या वर बिल झाले आहे. हा एक भाग झाला. माणूसकीच्या नात्याने कोणीतरी मदत केली. ती बाई वाचली. त्या कुत्र्याला तुम्ही उचलून घेऊन गेलात. त्याच्यावर उपचार केले आणि तो कुत्रा परत आणून तिथे सोडला. तो परत धावतो आता त्याचे काय करणार. परत कोणाला असे त्यांनी केले कारण तो वेडा झालेला आहे. तुम्ही त्याची नसबंदी केल्यावर बहुतेक कुत्रे ॲग्रेस होऊन जातात.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो ॲनीमल बर्थ कंट्रोलचे रुल्स आहेत ना त्याच्यामध्ये तसेच आहे.

**जुबेर इनामदार :-**

मान्य आहे पण ह्याच्यामध्ये काहीतरी बंदोबस्त करायला लागेल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ह्या संदर्भात कोणीतरी कोर्टात गेले पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

आपण कोर्टात जायची वाट बघता. आपण आपल्याकडे एक बंदीस्त एरिया बनवा ना. असे कुत्रे असतील त्यांना तिथे ठेवता येईल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आम्ही टाऊन प्लानिंग डिपार्टमेंटला सांगितले आहे. आम्हाला जागा द्या.

**जुबेर इनामदार :-**

आपल्याकडे जागा आहे ना. तिथे ठेवा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

तिकडे ऑब्जेक्शन आहे.

**जुबेर इनामदार :-**

आपण तिथे लसीकरण केंद्र केले आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ते दुसरीकडे आहे. डम्पींग ग्राऊंडवर नाही.

**जुबेर इनामदार :-**

साहेब ह्याचा मार्ग काढायला लागेल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

हे महत्वाचे आहे. स्थानिक स्वराज्यामध्ये स्वतःचे ॲनिमल.........

**जुबेर इनामदार :-**

कोणाचा तरी जीव जाऊ शकतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मध्यंतरी एक जागा घेतली होती. काशिमिरा साईडला पण ते काम बंद झाले.

**जुबेर इनामदार :-**

जागा शोधा. आपल्याकडे भरपूर आरक्षण आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

माणसाचे कुठेही जाऊ शकतो. परंतु मुक्या जनावरांची ट्रीटमेंट करणे महापालिकेचे आद्य कर्तव्य समजून कुठे जागा घेतल्या तर आपल्याकडे डॉक्टर आहेत. त्यामुळे ट्रीटमेंट करु शकतो. लसीकरण करणे किंवा प्रक्रिया करुन कंट्रोल न करता ॲनिमलला ट्रीटमेंट पण झाल्या पाहिजेत. त्या दृष्टीकोनातून पाऊल उचलायला लागेल. ह्या बजेटमध्ये तरतूद ठेऊन आपण करु.

**धृवकिशोर पाटील :-**

सविस्तर प्रस्ताव करा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

करतो. जागेचे करा बाकी करु शकतो.

**धृवकिशोर पाटील :-**

विचार विनिमय करु या. फक्त कुत्रे घेऊ नका, मांजरी पण घ्या. सर्व जनावर घ्या.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. १६७ :-**

**पुर्नविनियोजनाद्वारे तरतुद उपलब्ध करुन देणेबाबत. (पशु संवर्धन विभाग)**

**ठराव क्र. १४२ :-**

लेखाशिर्ष रुग्णालये व दवाखाने सांकेताक क्र. २२९० : कपडे धुलाई/साफसफाई इतर कामी रु. २ कोटी तरतूद करण्यात आली आहे. सदर तरतुदीमधून आज तारखेपर्यंत रु. ६१,२१,०००/- इतका खर्च झालेला असून रु. १,३८,७९,०००/- रक्कम शिल्लक आहे. रु. १,३८,७९,०००/- मधील रु. २० लक्ष मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त या लेखाशिर्षात पुननियोजन केल्यास सदर कामाचा सर्व खर्च भागविणे शक्य होणार आहे.

सबब, मा. नगरसेवक / नगरसेविका, पदधिकारी, नागरीक यांचे मोकाट कुत्र्यांबद्दलच्या तक्रारींचे प्रमाण लक्षात घेता उर्वरित कालावधीसाठी पुर्ननियोजन करणे आवश्यक वाटते तरी रुग्णालयीन कपडे धुलाई / साफसफाई / इतर कामे या लेखाशिर्षातून "मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त, निर्बिजीकरण व लसीकरण करणे" कामी या लेखाशिर्षाखाली रु. २०.०० लाख मात्र पुर्ननियोजन करणेस शिफारस असे.

तरी "मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त, निर्बिजीकरण व लसीकरण करणे" कामी या लेखाशिर्षाखाली रु. २०.०० लाख पुर्ननियोजनाद्धारे तरतुदीस सोबत जोडलेल्या प्रपत्रास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. हसमुख गेहलोत      अनुमोदन :- श्री. राकेश शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १६८, **मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसेस संचलनासाठी आवश्यक कर्मचारी वर्ग ठेका पध्दतीने घेणेकामी प्राप्त निविदा स्विकारणेस मंजूरी देणेबाबत.**

**हसमुख गेहलोत :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी JnNURM-II योजनेअंतर्गत प्राप्त बसेस दि.२५/१०/२०१५ पासून महानगरपालिका स्वतः चालवीत आहे. परिवहन उपक्रमाच्या बसेस चालविण्यासाठी बस ऑपरेटर नियुक्त होईपर्यंत महानगरपालिकेमार्फत बसेस संचलनासाठी लागणारे कर्मचारी ठेका पद्धतीने घेणेकामी मा.महासभा ठराव क्र.२२ दि.०८/११/२०१७ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरकामी निविदा प्रक्रिया करण्यात आली होती.

जाहिर निविदा सूचना व दोन मुदतवाढीनुसार प्राप्त ०२ निविदांबाबत दि.३१/०१/२०१८ रोजी मा.निविदा समितीची बैठक घेण्यात आली असता, स्पर्धात्मक दर प्राप्त होण्यासाठी एक आठवडयाची मुदत देऊन फेर निविदा मागविण्याबाबत मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार सदर कामी फेर निविदा सूचना व एक मुदतवाढ दिल्यानंतरही सदरकामी एकच निविदा प्राप्त झालेली होती. त्यामुळे सदरकामी पुनःश्च फेर निविदा मागविण्यासाठी मा.अतिरिक्त आयुक्त यांनी दि.२१/०२/२०१८ रोजी मान्यता दिली होती. त्यानुसार द्वितीय फेर निविदा प्रसिद्ध केल्यानंतर दि.१२/०३/२०१८ एकच निविदा प्राप्त झाली होती. त्यामुळे स्पर्धात्मक दर प्राप्त होण्यासाठी दि.२१/०३/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

मुदतीत दि.२१/०३/२०१८ पर्यंत एकुण ०२ निविदा प्राप्त झाल्या होत्या. परंतु, प्राप्त निविदांचे तांत्रिक कागदपत्रांची छाननी करण्यासाठी मा.निविदा समिती समोर दि.१९/०४/२०१८ रोजी सादर करण्यात आले असता, दोन्ही निविदाधारक सर्व अटिशर्तीची पूर्तता करीत नसल्याने फेर निविदा मागविणेची निविदा समितीने शिफारस केलेली होती. तसेच सदरकामी ०७ वेळेस निविदा सादर करण्यासाठी कालावधी देऊनही पुरेसा प्रतिसाद मिळत नसल्याने विभागाने अटीशर्ती बाबत फेर विचार करुन आवश्यक बदल करावा, अशी मा.निविदा समितीने शिफारस केली होती. सदरकामी निविदा अटी-शर्ती मध्ये अ.क्र.८ ते १४ अटीमध्ये काही प्रमाणात शिथिल करुन सुधारीत अटी-शर्तीनुसार जा.क्र.मनपा/परिवहन/१०६/२०१८-१९ दि.१८/०७/२०१८ अन्वये दै.महाराष्ट्र टाईम्स, दै.वृत्तमानस व दै.जनखुलासा या वृत्तपत्रात जाहिर फेर निविदा सूचना प्रसिद्ध

करुन दि.३०/०७/२०१८ पर्यंत ऑनलाईन निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार मुदतीत एकच निविदा प्राप्त झाली होती. त्यामुळे जा.क्र/मनपा/परिवहन/१२५/२०१८-१९ दि.३१/०७/२०१८ अन्वये प्रथम मुदतवाढ प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर मुदतीत दि.०८/०८/२०१८ पर्यंत फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्या होत्या. सबब, सदरकामी जा.क्र/मनपा/परिवहन/ १३५/२०१८-१९ दि.०९/०८/२०१८ अन्वये द्वितीय मुदतवाढ प्रसिद्ध करण्यात आली होती.त्यानुसार देखील सदर मुदतीत दि.१६/०८/२०१८ पर्यंत दोनच निविदा प्राप्त आहेत.

महानगरपालिका परिवहन विभागाच्या बसेसकरिता "बसेस संचलनासाठी आवश्यक कर्मचारी वर्ग ठेका पद्धतीने पुरवठा करणे" कामाकरीता मागविणेत आलेल्या तिसरी फेर निविदा सुचना व दोन वेळा मुदतवाढी अंती फक्त ०२ निविदा ऑनलाईन प्राप्त झालेल्या आहेत. सदरकामी यापुर्वी देखील ०७ वेळेस निविदा सादर करण्यासाठी मुदत दिली होती. तथापि, अल्प प्रतिसाद आल्याने अटिशर्ती शिथिल करुन फेरनिविदा व दोन मुदतवाढी अंती दोनच निविदा प्राप्त आहेत. सदरकामी एकूण १० वेळेस निविदा सादर करण्यासाठी कालावधी दिला असल्याने प्राप्त ०२ निविदांचे तांत्रिक लिफाफे उघडण्यास निविदा समितीने दि.०३/०९/२०१८ रोजी शिफारस केली होती. त्यानुसार तांत्रिक लिफाफे उघडले असता प्राप्त ०२ निविदाधारकांपैकी मे.सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरीटी प्रा.लि. यांची निविदा पात्र झाली असून मे.सुमेधा इंटरप्राईजेस प्रा.लि. यांची निविदा अपात्र झाली आहे. मे.सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरीटी प्रा.लि. यांचे दराचा लिफाफा (Financial Bid) उघडणेस निविदा समितीने दि.१५/०९/२०१८ रोजी मंजूरी दिली असून Financial Bid उघडण्यात आले आहे.

मे.सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरीटी प्रा.लि. यांना प्राप्त दरांबाबत वाटाघाटी करणेसाठी निविदा समिती समोर दि.२६/१०/२०१८ व दि.०२/११/२०१८ रोजी बोलविले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर कमी केले असुन यासंदर्भात मे.सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरीटी यांनी लेखी पत्र दिले आहे. त्यामध्ये वाटाघाटी अंती कमी केलेले दर हे सद्याचे किमान वेतन दर व प्रशासकिय खर्च विचारात घेऊन मान्य असल्याचे नमुद केले असून किमान वेतन दर व भत्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार देय रक्कम महानगरपालिकेने अदा करणे आवश्यक असल्याचे नमुद केले आहें. निविदाधारक यांनी निविदेत सादर केलेले दर व वाटाघाटी अंती मान्य केलेल्या दराचा तपशील खालीलप्रमाणे आहे. वाटाघाटीअंती सादर केलेले दरानुसार मे.सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरीटी प्रा.लि. यांची निविदा स्विकारणेस निविदा समितीने दि.०२/११/२०१८ रोजी शिफारस केली आहे.

| अ.क्र. | तपशिल | मे.सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरीटी प्रा.लि. यांनी निविदेत सादर केलेले दर (किमान वेतन कायदयानुसार व सर्व खर्चासह) (GST वगळून) | मे.सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरीटी प्रा.लि. यांनी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर (GST वगळून) |
|---|---|---|---|
| १. | पर्यवेक्षक | रु.२३,६९७/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) | रु.२२,७५९/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) |
| २. | मेकॅनिक | रु.२३,६९७/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) | रु.२२,७५९/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) |
| ३. | इलेक्ट्रीशियन | रु.२३,६९७/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) | रु.२२,७५९/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) |
| ४. | टायरमन | रु.२३,६९७/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) | रु.१९,५३५/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) |
| ५. | बॉडी फिटर | रु.२३,६९७/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) | रु.२२,७५९/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) |
| ६. | लिपीक (लेखनीक) | रु.२३,६९७/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) | रु.२१,४७३/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) |
| ७. | वाहतूक अधिकारी | रु.२३,६९७/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) | रु.२२,७५९/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) |
| ८. | वाहतूक नियंत्रक | रु.२३,६९७/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) | रु.२२,७५९/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) |
| ९. | बस निरिक्षक | रु.२३,६९७/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) | रु.२२,७५९/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) |
| १०. | बस प्रवर्तक | रु.२३,६९७/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) | रु.२२,७५९/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) |
| ११. | बस चालक | रु.२३,६९७/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) | रु.२२,७५९/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) |
| १२. | बस वाहक | रु.२३,६९७/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) | रु.२२,७५९/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) |

तरी वरिलप्रमाणे वाटाघाटी अंती मान्य केलेल्या दरानुसार मे.सैनिक इंटेलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांची निविदा स्विकारणेस ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. १६८ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसेस संचलनासाठी आवश्यक कर्मचारी वर्ग ठेका पध्दतीने घेणेकामी प्राप्त निविदा स्विकारणेस मंजूरी देणेबाबत.**

**ठराव क्र. १४३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी JnNURM-II योजनेअंतर्गत प्राप्त बसेस दि.२५/१०/२०१५ पासून महानगरपालिका स्वतः चालवीत आहे. परिवहन उपक्रमाच्या बसेस चालविण्यासाठी बस ऑपरेटर नियुक्त होईपर्यंत महानगरपालिकेमार्फत बसेस संचलनासाठी लागणारे कर्मचारी ठेका पद्धतीने घेणेकामी मा.महासभा ठराव क्र.२२ दि.०८/११/२०१७ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरकामी निविदा प्रक्रिया करण्यात आली होती.

जाहिर निविदा सूचना व दोन मुदतवाढीनुसार प्राप्त ०२ निविदांबाबत दि.३१/०१/२०१८ रोजी मा.निविदा समितीची बैठक घेण्यात आली असता, स्पर्धात्मक दर प्राप्त होण्यासाठी एक आठवडयाची मुदत देऊन फेर निविदा मागविण्याबाबत मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार सदर कामी फेर निविदा सूचना व एक मुदतवाढ दिल्यानंतरही सदरकामी एकच निविदा प्राप्त झालेली होती. त्यामुळे सदरकामी पुनःश्च फेर निविदा मागविण्यासाठी मा.अतिरिक्त आयुक्त यांनी दि.२१/०२/२०१८ रोजी मान्यता दिली होती. त्यानुसार द्वितीय फेर निविदा प्रसिद्ध केल्यानंतर दि.१२/०३/२०१८ एकच निविदा प्राप्त झाली होती. त्यामुळे स्पर्धात्मक दर प्राप्त होण्यासाठी दि.२१/०३/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

मुदतीत दि.२१/०३/२०१८ पर्यंत एकुण ०२ निविदा प्राप्त झाल्या होत्या. परंतु, प्राप्त निविदांचे तांत्रिक कागदपत्रांची छाननी करण्यासाठी मा.निविदा समिती समोर दि.१९/०४/२०१८ रोजी सादर करण्यात आले असता, दोन्ही निविदाधारक सर्व अटिशर्तीची पूर्तता करीत नसल्याने फेर निविदा मागविणेची निविदा समितीने शिफारस केलेली होती. तसेच सदरकामी ०७ वेळेस निविदा सादर करण्यासाठी कालावधी देऊनही पुरेसा प्रतिसाद मिळत नसल्याने विभागाने अटीशर्ती बाबत फेर विचार करुन आवश्यक बदल करावा, अशी मा.निविदा समितीने शिफारस केली होती. सदरकामी निविदा अटी-शर्ती मध्ये अ.क्र.८ ते १४ अटीमध्ये काही प्रमाणात शिथिल करुन सुधारीत अटी-शर्तीनुसार जा.क्र.मनपा/परिवहन/१०६/२०१८-१९ दि.१८/०७/२०१८ अन्वये दै.महाराष्ट्र टाईम्स, दै.वृत्तमानस व दै.जनखुलासा या वृत्तपत्रात जाहिर फेर निविदा सूचना प्रसिद्ध करुन दि.३०/०७/२०१८ पर्यंत ऑनलाईन निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार मुदतीत एकच निविदा प्राप्त झाली होती. त्यामुळे जा.क्र/मनपा/परिवहन/१२५/२०१८-१९ दि.३१/०७/२०१८ अन्वये प्रथम मुदतवाढ प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर मुदतीत दि.०८/०८/२०१८ पर्यंत फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्या होत्या. सबब, सदरकामी जा.क्र/मनपा/परिवहन/ १३५/२०१८-१९ दि.०९/०८/२०१८ अन्वये द्वितीय मुदतवाढ प्रसिद्ध करण्यात आली होती.त्यानुसार देखील सदर मुदतीत दि.१६/०८/२०१८ पर्यंत दोनच निविदा प्राप्त आहेत.

महानगरपालिका परिवहन विभागाच्या बसेसकरिता "बसेस संचलनासाठी आवश्यक कर्मचारी वर्ग ठेका पद्धतीने पुरवठा करणे" कामाकरीता मागविणेत आलेल्या तिसरी फेर निविदा सुचना व दोन वेळा मुदतवाढी अंती फक्त ०२ निविदा ऑनलाईन प्राप्त झालेल्या आहेत. सदरकामी यापुर्वी देखील ०७ वेळेस निविदा सादर करण्यासाठी मुदत दिली होती. तथापि, अल्प प्रतिसाद आल्याने अटिशर्ती शिथिल करुन फेरनिविदा व दोन मुदतवाढी अंती दोनच निविदा प्राप्त आहेत. सदरकामी एकूण १० वेळेस निविदा सादर करण्यासाठी कालावधी दिला असल्याने प्राप्त ०२ निविदांचे तांत्रिक लिफाफे उघडण्यास निविदा समितीने दि.०३/०९/२०१८ रोजी शिफारस केली होती. त्यानुसार तांत्रिक लिफाफे उघडले असता प्राप्त ०२ निविदाधारकांपैकी मे.सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरीटी प्रा.लि. यांची निविदा पात्र झाली असून मे.सुमेधा इंटरप्राईजेस प्रा.लि. यांची निविदा अपात्र झाली आहे. मे.सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरीटी प्रा.लि. यांचे दराचा लिफाफा (Financial Bid) उघडणेस निविदा समितीने दि.१५/०९/२०१८ रोजी मंजूरी दिली असून Financial Bid उघडण्यात आले आहे.

मे.सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरीटी प्रा.लि. यांना प्राप्त दरांबाबत वाटाघाटी करणेसाठी निविदा समिती समोर दि.२६/१०/२०१८ व दि.०२/११/२०१८ रोजी बोलविले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर कमी

केले असुन यासंदर्भात मे.सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरीटी यांनी लेखी पत्र दिले आहे. त्यामध्ये वाटाघाटी अंती कमी केलेले दर हे सद्याचे किमान वेतन दर व प्रशासकिय खर्च विचारात घेऊन मान्य असल्याचे नमुद केले असून किमान वेतन दर व भत्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार देय रक्कम महानगरपालिकेने अदा करणे आवश्यक असल्याचे नमुद केले आहें. निविदाधारक यांनी निविदेत सादर केलेले दर व वाटाघाटी अंती मान्य केलेल्या दराचा तपशील खालीलप्रमाणे आहे. वाटाघाटीअंती सादर केलेले दरानुसार मे.सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरीटी प्रा.लि. यांची निविदा स्विकारणेस निविदा समितीने दि.०२/११/२०१८ रोजी शिफारस केली आहे.

| अ.क्र. | तपशिल | मे.सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरीटी प्रा.लि. यांनी निविदेत सादर केलेले दर (किमान वेतन कायदयानुसार व सर्व खर्चासह) (GST वगळून) | मे.सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरीटी प्रा.लि. यांनी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर (GST वगळून) |
|---|---|---|---|
| १. | पर्यवेक्षक | रु.२३,६९७/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) | रु.२२,७५९/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) |
| २. | मेकॅनिक | रु.२३,६९७/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) | रु.२२,७५९/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) |
| ३. | इलेक्ट्रीशियन | रु.२३,६९७/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) | रु.२२,७५९/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) |
| ४. | टायरमन | रु.२३,६९७/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) | रु.१९,५३५/ (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) |
| ५. | बॉडी फिटर | रु.२३,६९७/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) | रु.२२,७५९/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) |
| ६. | लिपीक (लेखनीक) | रु.२३,६९७/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) | रु.२१,४७३/ (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) |
| ७. | वाहतूक अधिकारी | रु.२३,६९७/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) | रु.२२,७५९/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) |
| ८. | वाहतूक नियंत्रक | रु.२३,६९७/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) | रु.२२,७५९/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) |
| ९. | बस निरिक्षक | रु.२३,६९७/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) | रु.२२,७५९/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) |
| १०. | बस प्रवर्तक | रु.२३,६९७/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) | रु.२२,७५९/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) |
| ११. | बस चालक | रु.२३,६९७/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) | रु.२२,७५९/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) |
| १२. | बस वाहक | रु.२३,६९७/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) | रु.२२,७५९/- (प्रती कर्मचारी, प्रतीमहा) |

तरी वरिलप्रमाणे वाटाघाटी अंती मान्य केलेल्या दरानुसार मे.सैनिक इंटेलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांची निविदा स्विकारणेस ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. हसमुख गेहलोत        अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १६९, **निविदेस मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)**

**राकेश शाह :-**

| अ.क्र | टेंडर आय डी | कामाचे नाव / ठेकेदाराचे नाव | अंदाजित खर्च/ ठेकेदाराने सादर केलेले दर | मा. आयुक्त यांची प्रशासकीय/ आर्थिक मान्यता दिनांक | मा. समिती शिफारस दिनांक | वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक | ई-टेंडरींग निविदा प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | **358913_1** | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र. १३ घोडबंदर, वामनदेव नगर येथील मुख्य रस्ता ते कपाडिया कंपाऊंड पर्यंत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे व चेकर्ड लादया बसविणे. (दलित वस्ती निधी)<br>**मे. महेश सुरेश चाटे**<br>मे. एम.एस. इंटरप्रायझेस<br>मे. एन.जे.ब्रदर्स<br>मे. राठोड असोसिएट्स<br>मे. श्रृती इंटरप्रायझेस<br>मे. तिरुपती बालाजी इंटरप्रायझेस<br>मे. विकास इंटरप्रायझेस<br>मे. यलेश बसप्पा अदुकोल<br>मे. आकाश इंटरप्रायझेस | रु.३१,४८,७००/-<br><br>१८.००९० % कमी दराने<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**१८.००९० % कमी दराने**<br><br>१७.५००० % कमी दराने<br>१५.७१०० % कमी दराने<br>१५.११०० % कमी दराने<br>१५.०००० %कमी दराने<br>९.०००० % कमी दराने<br>१५.२१०० % कमी दराने<br>८.६००० % कमी दराने | दि.६/९/२०१८ | दि.१५/११/१८ | दै. मिड डे, दै. मुंबई लक्षद्विप, दै. ठाणे वैभव<br>दि.३/१०/२०१८ | दि.०९/१०/१८ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | १४.५१०० % कमी दराने | | | | |
| २. | 355458_1 | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र. १३ घोडबंदर, मॉर्डन झोपडपट्टी येथिल लहूजी मंदिर ते कापडिया कंपाऊंड पर्यंत गटार व नाला बांधणे व चेकर्ड लादया बसविणे. (दलित वस्ती निधी)<br>मे. मुस्कान इंटरप्रायझेस<br>मे. एन.जे.ब्रदर्स<br>मे. राठोड असोसिएट्स<br>मे. श्रृती इंटरप्रायझेस<br>मे. तिरुपती बालाजी इंटरप्रायझेस<br>मे. विकाश इंटरप्रायझेस<br>मे. यलेश बसप्पा अदुकोल<br>मे. महेश सुरेश चाटे<br>मे. एम.एस. इंटरप्रायझेस<br>मे. पार्श्व कॉर्पोरेशन | रु.४३,०३,१००/-<br>१८.२९००% कमी दराने<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**१८.२९०० % कमी दराने**<br>१५.७१०० % कमी दराने<br>१५.५१०० % कमी दराने<br>१५.०००० % कमी दराने<br>११.०००० % कमी दराने<br>१५.२१०० % कमी दराने<br>५.५००० % कमी दराने<br>८.०००० % कमी दराने<br>१७.५००० % कमी दराने<br>१४.५८०० % कमी दराने | दि.६/९/२०१८ | दि.१५/११/१८ | दै. मिड डे, दै. मुंबई लक्षद्विप, दै. ठाणे वैभव<br>दि.३/१०/२०१८ | दि.०९/१०/१८ |
| ३. | 348282_1 | भाईंदर (पुर्व) नवघर नाका परिसराचे सुशोभीकरण व स्वातंत्र्य सैनिकाचे स्मारक बांधणे.<br>मे. तिरूपती बालाजी इंटरप्राईजेस<br>मे. एम.एस. इंटरप्राईजेस<br>मे. गारनेट इंटेरियर्स प्रा.लि. | रु.५८,५६,७५७/-<br>११.०००० % कमी दराने<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**११.०००० % कमी दराने**<br>२.१५०० % कमी दराने<br>२.०००० % कमी दराने | दि.२१/७/२०१८ | दि.०२/११/१८ | दै. सागर, दै. सामना, दै. आपल महानगर<br>दि.१९/०९/२०१८ | दि.७/८/२०१८ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. | **362283_1** | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे महाजनवाडी येथे तरण तलाव बांधणे.<br><br>**मे. शायोना कॉर्पोरेशन**<br><br><br>मे. गजानन कंस्ट्रक्शन<br>मे. स्पार्क सिव्हील इन्फ्रा. प्रोजेक्ट<br>मे. श्रीजी कंस्ट्रक्शन | रु.३,११,२७,१००/-<br><br>९.०००० % जास्त दराने<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**९.०००० % जास्त दराने**<br>१५.१२०० % जास्त दराने<br>१९.५००० % जास्त दराने<br>२२.०००० % जास्त दराने | दि.१४/३/२०१८ | दि.३०/११/१८ | दै. पुण्य नगरी, दै. परशुराम समाचार, दै. महाराष्ट्र सम्राट दि.२०/९/२०१८ | दि.२६/९/२०१८ |
| ५. | ३६७१६४_१ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर व रेतीबंदर येथील पुरात शिवमंदिर परीसर सुशोभिकरण करणे, रेतीबंदर गावठाण येथील स्मशानभुमीची दुरुस्ती व नुतनीकरण करणे, कब्रस्तान येथील जागेस कुंपणभिंत बांधणे, मेरी गोल्ड २ व ३ परीसरातील सुशोभिकरण करणे, प्रभाग क्र. १३ मध्ये गटारे इतर आवश्यक कामे करणे. (उपमहापौर स्वेच्छा निर्णय निधी)<br>● मे. एम.एस. इंटरप्रायझेस<br>● मे. राठोड ब्रदर्स<br>● मे. श्री गणेश इंटरप्रायझेस | रु.१,३३,९१,००२/-<br><br>अंदाजपत्रकीय दराने<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**०.२५ % कमी दराने**<br>६.००% जास्त दराने<br>४.००% जास्त दराने | दि.६/९/२०१८ | १७/१२/२०१८ | दै. प्रवाह, दै. लक्षद्विप, हिंदमाता दि.२४/१०/२०१८ | दि.२९/१०/१८ |

वरीलपैकी कमी दराच्या निविदांना मान्यता देण्यात येत आहे.

**वर्षा भानुशाली :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. १६९ :-**

**निविदेस मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)**

**ठराव क्र. १४४ :-**

| अ.क्र | टेंडर आय डी | कामाचे नाव / ठेकेदाराचे नाव | अंदाजित खर्च/ ठेकेदाराने सादर केलेले दर | मा. आयुक्त यांची प्रशासकीय/ आर्थिक मान्यता दिनांक | मा. समिती शिफारस दिनांक | वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक | ई-टेंडरींग निविदा प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ६. | **358913_1** | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र. १३ घोडबंदर, वामनदेव नगर येथील मुख्य रस्ता ते कपाडिया कंपाऊंड पर्यंत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे व चेकर्ड लादया बसविणे. (दलित वस्ती निधी)<br>**मे. महेश सुरेश चाटे**<br>मे. एम.एस. इंटरप्रायझेस<br>मे. एन.जे.ब्रदर्स<br>मे. राठोड असोसिएट्स<br>मे. श्रृती इंटरप्रायझेस<br>मे. तिरुपती बालाजी इंटरप्रायझेस<br>मे. विकास इंटरप्रायझेस<br>मे. यलेश बसप्पा अदुकोल<br>मे. आकाश इंटरप्रायझेस | रु.३१,४८,७००/-<br>१८.००९० % कमी दराने<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**१८.००९० % कमी दराने**<br>१७.५००० % कमी दराने<br>१५.७१०० % कमी दराने<br>१५.११०० % कमी दराने<br>१५.०००० %कमी दराने<br>९.०००० % कमी दराने<br>१५.२१०० % कमी दराने<br>८.६००० % कमी दराने<br>१४.५१०० % कमी दराने | दि.६/९/२०१८ | दि.१५/११/१८ | दै. मिड डे, दै. मुंबई लक्षद्विप, दै. ठाणे वैभव<br>दि.३/१०/२०१८ | दि.०९/१०/१८ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७. | **355458_1** | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र. १३ घोडबंदर, मॉर्डन झोपडपट्टी येथिल लहूजी मंदिर ते कापडिया कंपाऊंड पर्यंत गटार व नाला बांधणे व चेकर्ड लादया बसविणे. (दलित वस्ती निधी)<br>मे. मुस्कान इंटरप्रायझेस<br>मे. एन.जे.ब्रदर्स<br>मे. राठोड असोसिएट्स<br>मे. श्रुती इंटरप्रायझेस<br>मे. तिरुपती बालाजी इंटरप्रायझेस<br>मे. विकाश इंटरप्रायझेस<br>मे. यलेश बसप्पा अदुकोल<br>मे. महेश सुरेश चाटे<br>मे. एम.एस. इंटरप्रायझेस<br>मे. पार्श्व कॉर्पोरेशन | रु.४३,०३,१००/-<br><br>१८.२९००% कमी दराने<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**१८.२९०० % कमी दराने**<br>१५.७१०० % कमी दराने<br>१५.५१०० % कमी दराने<br>१५.०००० % कमी दराने<br>११.०००० % कमी दराने<br>१५.२१०० % कमी दराने<br>५.५००० % कमी दराने<br>८.०००० % कमी दराने<br>१७.५००० % कमी दराने<br>१४.५८०० % कमी दराने | दि.६/९/२०१८ | दि.१५/११/१८ | दै. मिड डे, दै. मुंबई लक्षद्विप, दै. ठाणे वैभव<br>दि.३/१०/२०१८ | दि.०९/१०/१८ |
| ८. | **348282_1** | भाईंदर (पुर्व) नवघर नाका परिसराचे सुशोभीकरण व स्वातंत्र्य सैनिकाचे स्मारक बांधणे.<br><br>मे. तिरूपती बालाजी इंटरप्राईजेस<br><br>मे. एम.एस. इंटरप्राईजेस<br>मे. गारनेट इंटेरियर्स प्रा.लि. | रु.५८,५६,७५७/-<br><br>११.०००० % कमी दराने<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**११.०००० % कमी दराने**<br>२.१५०० % कमी दराने<br>२.०००० % कमी दराने | दि.२१/७/२०१८ | दि.०२/११/१८ | दै. सागर, दै. सामना, दै. आपल महानगर<br>दि.१९/०९/२०१८ | दि.७/८/२०१८ |
| ९. | **362283_1** | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे महाजनवाडी येथे तरण तलाव बांधणे. | रु.३,११,२७,१००/- | दि.१४/३/२०१८ | दि.३०/११/१८ | दै. पुण्य नगरी, दै. परशुराम समाचार, | दि.२६/९/२०१८ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **मे. शायोना कॉर्पोरेशन**<br><br>मे. गजानन कंस्ट्रक्शन<br>मे. स्पार्क सिव्हील इन्फ्रा. प्रोजेक्ट<br>मे. श्रीजी कंस्ट्रक्शन | ९.०००० % जास्त दराने<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**९.०००० % जास्त दराने**<br>१५.१२०० % जास्त दराने<br>१९.५००० % जास्त दराने<br>२२.०००० % जास्त दराने | | | दै. महाराष्ट्र सम्राट दि.२०/९/२०१८ | |
| **१०.** | ३६७१६४_१ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर व रेतीबंदर येथील पुरात शिवमंदिर परीसर सुशोभिकरण करणे, रेतीबंदर गावठाण येथील स्मशानभुमीची दुरुस्ती व नुतनीकरण करणे, कब्रस्तान येथील जागेस कुंपणभिंत बांधणे, मेरी गोल्ड २ व ३ परीसरातील सुशोभिकरण करणे, प्रभाग क्र. १३ मध्ये गटारे इतर आवश्यक कामे करणे. (उपमहापौर स्वेच्छा निर्णय निधी)<br>● मे. एम.एस. इंटरप्रायझेस<br>● मे. राठोड ब्रदर्स<br>● मे. श्री गणेश इंटरप्रायझेस | रु.१,३३,९१,००२/-<br><br>अंदाजपत्रकीय दराने<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**०.२५ % कमी दराने**<br>६.००% जास्त दराने<br>४.००% जास्त दराने | दि.६/९/२०१८ | १७/१२/२०१८ | दै. प्रवाह, दै. लक्षद्विप, हिंदमाता दि.२४/१०/२०१८ | दि.२९/१०/१८ |

वरीलपैकी कमी दराच्या निविदांना मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. राकेश शाह  अनुमोदन :- सौ. वर्षा भानुशाली**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १७०, **निविदेस मान्यता देणे. (अग्निशमन विभाग)**

**मा. सभापती :-**

गोषवारा आला नाही. गोषवारा येईल त्यावेळी विषय घेऊ.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १७१, **मा. अति. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदेचे अवलोकन करणे. (भांडार विभाग) -- मिरा भाईंदर महानगरपालिकेस दैनिक वृत्तपत्रे , साप्ताहिके, पाक्षिके, दिवाळी अंक व मासिके इ. पुरवठा करणे.**

**मा. सभापती :-**

मॅडम जे साहित्य आहे ते सर्व सदस्यांना पुरवण्यात यावे.

**प्रकरण क्र. १७१ :-**

**मा. अति. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदेचे अवलोकन करणे. (भांडार विभाग) -- मिरा भाईंदर महानगरपालिकेस दैनिक वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, दिवाळी अंक व मासिके इ. पुरवठा करणे.**

ठराव क्र. १४५ :-

**मिरा भाईंदर महानगरपालिकेस दैनिक वृत्तपत्रे , साप्ताहिके, पाक्षिके, दिवाळी अंक व मासिके इ . पुरवठा करणेकामी मा. आयुक्त यांची मंजुरी घेऊन E-Tendering व्दारे तसेच वृत्तपत्रात जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आलेली होती . त्याकरिता पात्र निविदाधारकांनी सादर केलेल्या व त्यापैकी कमी दर असलेल्या निविदसे मा. अति. आयुक्त यांनी दि. 09/05/2018 रोजी मान्यता दिलेली आहे. महानगरपालिकेस दैनिक वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, दिवाळी अंक व मासिके इ. पुरवठा करणेकामी अंदाजित रु. 6.00 लाखाच्या मर्यादेत खर्च अपेक्षित आहे.**

**तरी सदर कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (ड) अन्वये सदर प्रकरणांचे अवलोकन करण्यात येत आहे.**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १७२, **मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदेचे अवलोकन करणे . (भांडार विभाग) -- मिरा भाईंदर महानगरपालिकेस विविध प्रकारची स्टेशनरी पुरवठा करणे.**

**मा. सभापती :-**

अवलोकन मंजूर.

**प्रकरण क्र. १७२ :-**

**मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदेचे अवलोकन करणे. (भांडार विभाग) -- मिरा भाईंदर महानगरपालिकेस विविध प्रकारची स्टेशनरी पुरवठा करणे.**

ठराव क्र. १४६ :-

**मिरा भाईंदर महानगरपालिकेस विविध प्रकारची स्टेशनरी पुरवठा करणेकामी मा. आयुक्त यांची मंजुरी घेऊन E-Tendering व्दारे तसेच वृत्तपत्रात जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आलेली होती. त्याकरिता पात्र निविदाधारकांनी सादर केलेल्या व त्यापैकी कमी दर असलेल्या निविदेस मा . आयुक्त** सो. **यांनी दि. 16/11/2018 रोजी मान्यता दिलेली आहे. महानगरपालिकेस विविध प्रकारची स्टेशनरी पुरवठा करणेकामी अंदाजित रु. 10.00 लाखाच्या मर्यादेत खर्च अपेक्षित आहे.**

**तरी सदरचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (ड) अन्वये मा. स्थायी समिती सभेमध्ये अवलोकन करण्यात येत आहे.**

धृवकिशोर पाटील :-

जमा खर्च अवलोकनाचा विषय घेतला नाही. त्याच्यात माझी सुचना आहे. जमा खर्चाचे जे अवलोकन आहे तो विषय घेण्यात यावा. आढावा घेताना ऑडिटरचा...........

**जुबेर इनामदार :-**

ऑडिटरचा अभिप्राय घ्या.

**मा. सभापती :-**

पुढच्या मिटींगमध्ये घेऊ.

**जुबेर इनामदार :-**

जाहिरात टॅक्ससाठी विशेष बैठक लावा.

**मा. सभापती :-**

लावतो. ऑडिटचे जे अहवाल आहेत ते प्रिपेर करुन समितीपुढे सादर करा. सभा संपली असे जाहिर करतो.

**(सभा संपल्याची वेळ दु. १२.४० वाजता)**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

